मंगळवार, १५ नोव्हेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ११८
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


अंतरंग

जेएनपीए संचालकपदासाठी आज निवडणूक/२

लोक अदालतीमध्ये ३५ हजार २६५ प्रकरणे निकाली/५

रायगडच्या आर्यन पाटीलला उंच उडीत सुवर्णपदक/८

## मुंबईतील तरुणीची प्रियकराकडून दिल्लीत निर्घृण हत्या



**नवी दिल्ली :** मुंबईतील श्रद्धा वॉकर या तरुणीच्या निर्घृण हत्येने देश हादरला आहे. प्रियकरानेच श्रद्धाची हत्या करीत तिच्या शरीराचे ३५ तुकडे करून ते दिल्लीतील विविध ठिकाणी टाकून दिले. पाच महिन्यांनी या हत्येचा खुलासा झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी श्रद्धाचा प्रियकर आफताब अमीन पुनावाला याला अटक केली आहे. श्रद्धा आणि आफताब मुंबईत एका कॉल सेंटरमध्ये काम करीत होते. तिथेच त्यांची ओळख झाली आणि प्रेम जडले. यानंतर दोघे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहू लागले. दरम्यान, श्रद्धाचा फोन बंद येत असल्याचे कळल्याने वडिलांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. त्यांनी पोलिसांकडे याबाबत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपास सुरू करून आफताबला ताब्यात घेतले. त्याने श्रद्धाची निर्घृणपणे हत्या करून मृतदेहाचे तुकडे फेकून दिल्याची कबुली दिली आहे.

# पेण अर्बन बँक ठेवीदारांना आशेचा किरण

## सहकारमंत्र्यांसोबत बैठक होणार -भाजप नेते किरीट सोमय्या



(छाया : अनिस मनियार)

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा



**पेण : प्रतिनिधी**

पेण अर्बन बँकेच्या मुख्य कार्यालयात भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सोमवारी (दि. १४) भेट देऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या वेळी त्यांनी बँक ठेवीदारांबाबत लवकरच सहकारमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक होऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे सांगितले. त्यामुळे ठेवीदारांना आशेचा किरण दिसू लागला आहे.

पेण अर्बन ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजप नेते किरीट सोमय्या सोमवारी बँकेच्या मुख्य शाखेत आले होते. त्यांच्यासमवेत भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी मंत्री व स्थानिक आमदार रविशेठ पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी उपनगराध्यक्ष वैशाली कडू, संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेंद्र जाधव, भाजप सरचिटणीस मिलिंद पाटील, उपाध्यक्ष राजेश मपारा, सुनील गोगटे, युवा नेते ललित पाटील, शांता भावे यांच्यासह खातेदार, ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या वेळी सोमय्या यांनी बँक संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेन जाधव यांच्या निवासस्थानीही सदिच्छा भेट दिली.

पेण अर्बन बँक सन २०१०मध्ये बुडीत निघाली आणि पेणसह रायगड जिल्ह्यात हाहाकार माजला. यामुळे सहकार क्षेत्राला मोठा हादरा बसला होता. ७५ वर्षांची परंपरा असलेल्या या बँक घोटाळ्याला एक तप होऊन गेले असून ठेवीदार व खातेदार आपले पैसे कधी मिळतील या आशेवर आहेत. यासाठी माजी खासदार किरीट सोमय्या यांनी पुढाकार घेतला आहे. ते म्हणाले की, सहकारमंत्री यांच्या उपस्थितीत लवकरच पेण अर्बन बँक ठेवीदारांबाबत संबंधितांची बैठक होऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल. संचालकांनी बँकेची जी लूट केली आहे त्याबाबत कोर्टात खटला सुरू होण्याची मागणीही करणार आहोत. एक लाख ६५ हजार ठेवीदारांना न्याय मिळावा याकरिता महिनाभरापूर्वीदेखील सहकारमंत्री यांच्यासोबत मंत्रालयात बैठक झाली होती.

पेण अर्बन बँकेच्या सर्वच्या सर्व ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढा देणार आहोत आजपर्यंत पहिल्या टप्प्यात १० हजार रुपये आणि दुसऱ्या टप्प्यात २५ हजार रुपये असतील अशा २० हजारांहून अधिक ठेवीदारांना त्याची रक्कम परत मिळवून देण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. आता जे उर्वरित ठेवीदार आहेत त्यांना रक्कम मिळवून देण्यासाठी जप्त प्रॉपर्टीची लवकरात लवकर विक्री व्हावी, अशी आमची मागणी असून आलेल्या रकमेतून उर्वरित सर्व ठेवीदारांना त्याच्या ठेवी परत मिळवून देण्यासाठी आमचे प्रयत्न असतील, असे बँक संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेन जाधव यांनी सांगितले.

### प्रॉपर्टी विक्रीचा मार्ग मोकळा

आनंदाची बाब म्हणजे सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) या प्रॉपर्टीची विक्री करण्यासाठी तयारी दाखविली आहे. बँक आणि ईडीमध्ये जे वाद चालू होते ते मिटले आहेत. ठेवीदारांना पैसे परत मिळावे म्हणून ते प्रॉपर्टीवरील आपला हक्क कोर्टात मागे घ्यायला तयार आहेत. बँकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, बँकेने कोर्टात केलेला अर्ज मागे घेण्यात येईल. पुढच्या आठवड्यात दिल्लीला जाऊन ईडीच्या अधिकाऱ्यांशी बोलून कोर्टात जाऊन ईडी आपला हक्क मागे घेईल यासाठी प्रयत्न करणार आहोत. त्यामुळे काही प्रॉपर्टी विकण्यासाठी काढाव्या लागणार आहेत. या बँकेने रिझर्व्ह बँकेला पत्र देऊन पाच लाख व एक लाख देण्याची मागणी केली आहे, परंतु पाच लाख देता येणार नाही, असे इन्शुरन्स कंपनीने कळविले आहे. त्यामुळे एक लाख रुपये मिळण्याची शक्यता आहे, असेही सोमय्या यांनी सांगितले.

## जितेंद्र आव्हाड पुन्हा अडचणीत

### विनयभंगाचा गुन्हा दाखल



**ठाणे : प्रतिनिधी**

'हर हर महादेव' चित्रपटाचा शो थांबवून प्रेक्षकांना मारहाण केल्याप्रकरणी राज्याचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांची जामिनावर सुटका झालेली असतानाच आता त्यांच्याविरोधात एका महिलेने विनयभंगाचा आरोप केला असून या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी ठाण्यात दोन उड्डाणपुलांचे लोकार्पण करण्यात आले. या सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा स्थानिक आमदार डॉ. जितेंद्र आव्हाडही उपस्थित होते. सोहळ्यानंतर मुख्यमंत्र्यांचा ताफा डोंबिवलीकडे रवाना होण्याआधी त्या ठिकाणी उपस्थित भाजपच्या एका कार्यकर्ता महिलेने मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला, पण मुख्यमंत्र्यांच्या गाडीजवळ जात असताना जितेंद्र आव्हाडांनी हाताने धरून बाजूला ढकलल्याचे सांगत पीडित महिलेने मुंब्रा पोलीस ठाण्यात आव्हाडांविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.


दरम्यान, विनयभंगाचा आरोप करणाऱ्या भाजप कार्यकर्ता महिलेने नंतर पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू मांडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रम स्थळावरून परत जात होते, तेव्हा मी त्यांना भेटायला जात असताना समोरून आमदार जितेंद्र आव्हाड आले. स्थानिक आमदार असल्याने मी त्यांना पाहून स्मितहास्य केले. तेव्हा त्यांनी मला तू इथे काय करतेस म्हणत हाताने जोरात धरून बाजूला लोटले. त्यांनी मला धक्का देताना हा विचार केला नाही की तिथे सर्व पुरुष होते आणि त्यांनी लोटल्यावर मी आजूबाजूच्या पुरुषांच्याच अंगावर गेले. जे घडले ते सर्वांसमोर आहे. जो कायदा सर्वांसाठी आहे तो कायदा जितेंद्र आव्हाड यांनाही लागू व्हावा, अशी मागणीही पीडितेने या वेळी केली.

**महिलेने गुन्हा दाखल केला आहे. त्यानुसार पोलीस चौकशी करून तपास आणि पडताळणी करतील. गुन्ह्यात तथ्य असेल, नसेल हे पाहून पोलीस पुढील कारवाई करतील. राजकीय सूड भावनेपोटी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.**

**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

## निवडक

### ज्येष्ठ सिने अभिनेते सुनील शेंडे यांचे निधन



**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सुनील शेंडे यांचे सोमवारी (दि. १४) रात्री निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. ते घरातच चक्कर येऊन पडले. त्यामुळे त्यांच्या शरीरात अंतर्गत रक्तस्राव झाल्याने विलेपार्ले येथील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. शेंडे यांनी मराठी चित्रपटसृष्टीसह अनेक हिंदी चित्रपटांत भूमिका साकारल्या. 'सरफरोश', 'गांधी', 'वास्तव' यांसारख्या चित्रपटात त्यांच्या भूमिका लोकप्रिय ठरल्या होत्या.

### सागरी सुरक्षेसाठी आजपासून ऑपरेशन 'सी व्हिजिल'

**नवी दिल्ली :** सागरी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ऑपरेशन 'सी व्हिजिल' मंगळवारी (दि. १५) सकाळी ८ वाजता सुरू होणार असून ते १६ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजता संपेल. यासाठी यंत्रणा सज्ज झाल्या असून निळ्या गटाचे संपूर्ण देशाचे सागरी सुरक्षा चक्र लाल गट कसे भेदणार याकडे नौदल सामरिक तज्ज्ञांबरोबरच देशाचे लक्ष लागले आहे.

## शेकापकडून राष्ट्रवादीचा पाणउतारा

### माजी नगरसेवक सतीश पाटील यांनी व्यक्त केली नाराजी



**कळंबोली : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाला कोकण शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व देण्यासाठी आम्ही अहोरात्र मेहनत घेतली, मात्र याच शेकापचे नेते हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पात्रता काढतात, अशा शब्दांत राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक सतीश पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कळंबोली येथे आयोजित शरद युवा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.

राष्ट्रवादीच्या शरद युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच कळंबोलीतील न्यू इंग्लिश स्कूल येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्यासह पक्षाचे अन्य नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी माजी नगरसेवक सतीश पाटील यांनी आपल्या भाषणात शेकापच्या नेत्यांकडून पनवेल राष्ट्रवादीला डिवचले जात असून आमचा अपमान केला जात असल्याचे जाहीरपणे सांगितले.

राष्ट्रवादीच्या मदतीने कोकण शिक्षक मतदारसंघामध्ये मागील वेळेस शेकापचे बाळाराम पाटील यांना उमेदवारी दिल्यानंतर आम्ही त्यांना मदत केली, मात्र शेकापचे काही नेते राष्ट्रवादीला कमी लेखून पाणउतारा करीत असल्याच्या भावना या वेळी सतीश पाटील यांनी व्यक्त केल्या. त्यामुळे शेकाप आणि राष्ट्रवादीमधील धुसफूस समोर आली आहे. त्याचप्रमाणे याचे पडसाद आगामी काळात उमटण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मान्यतेने अवधेश अयोध्या कुमार यांची पक्षाच्या उत्तर भारतीय मोर्चा उलवे नोड अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी उत्तर भारतीय मोर्चा जिल्हाध्यक्ष जितेंद्र तिवारी, मनोज मौर्य, सुनील कुमार उपस्थित होते.**

## खारघरमध्ये वर्ल्डकप फायनलवर जुगार

### चौकडी ताब्यात; साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यावर पैसे लावून जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हे शाखा कक्ष ३च्या पथकाने छापा टाकत चार जणांना अटक केली आहे. या छापेमारीत सात लाख ४५ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

खारघर केसर बिल्डिंग ४ येथे रूम नं. ७०२मध्ये काही व्यक्ती टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी (दि. १३) खेळल्या जात असलेल्या इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील अंतिम सामन्यावर बेकायदेशीर जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष ३चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने छापा मारून निलेश राजकुमार रामरखयानी (वय ३३), सुनील राजकुमार मखिजा (वय ४३), सतिश गोविंद लोखंडे (वय ३४) व जयकुमार तिरथदास कुकरेजा (वय ३७) या चौकडीला ताब्यात घेतले आहे. **(पान २ वर..)**

## एक धाव कॅन्सर योद्ध्यांसाठी!

### कामोठे येथे १८ डिसेंबरला मॅरेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोनाविरुद्धचा लढा आपण जवळपास जिंकलेला आहे, पण आजही अनेक जण कोरोना इतक्याच भीषण आजाराशी लढा देत आहे आणि तो आजार आहे कॅन्सर. या लढ्यात कॅन्सरग्रस्तांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि कॅन्सरविषयी सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी छाबा फाउंडेशन ट्रस्टतर्फे येत्या १८ डिसेंबर रोजी एक धाव कॅन्सर योद्ध्यांसाठी हे ध्येय वाक्य ठेवून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



कामोठे सेक्टर ६मधील रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानात १८ डिसेंबरला सकाळी ६.३० वाजता या स्पर्धेची सुरुवात होणार असून याच ठिकाणी सकाळी ८.३० वाजता बक्षीस वितरण समारंभ होईल. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

६ ते १७ मुले आणि मुली, १८ ते ३०, ३१ ते ४०, ४१ ते ५० आणि ५१+ पुरुष आणि महिला गटात होणाऱ्या या स्पर्धेतील सहभाग किटमध्ये टी-शर्ट, नाश्ता, टायमिंग चिप, पदक, प्रमाणपत्र आणि विजेत्यांसाठी ट्रॉफी देण्यात येणार आहे.

इच्छुकांनी https://www.townscript.com/e/chhaba-foundation-trust-kamothe-run-443004 या लिंकद्वारे ऑनलाईन नोंदणी करावी. ऑफलाईन नोंदणी व अधिक माहितीसाठी छाबा फाउंडेशन ट्रस्टशी ९६१९४५२४४७, ८३६९६११२०६ या क्रमांकांवर संपर्क करावा, असे आवाहन अध्यक्ष दामोदर चव्हाण, उपाध्यक्ष सचिन तांबोळी, खजिनदार शेखर जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बीकेसी संघ 'आरपीएल'चा मानकरी

### परेश ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण




**रसायनी : रामप्रहर वृत्त**

बहुचर्चित आरपीएल अर्थात रोटरी प्रीमियर लीगच्या दुसऱ्या हंगामाचे बीकेसी संघाने विजेतेपद पटकाविले आहे, तर आदित्य फायटर संघ उपविजेता ठरला. विजेत्यांना पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व रोटरी क्लबचे सदस्य परेश ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. (टीआयपीएल) च्या सौजन्याने आयोजित आरपीएलचा अंतिम सामना रविवारी (दि. १३) रसायनी येथील एनआयएसएम मैदानात रंगला. अतिशय उत्कंठावर्धक झालेल्या अंतिम सामन्यात बीकेसी संघाने आदित्य फायटर संघाला नमवित विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत मालिकावीर म्हणून पुष्कराज जोशी, उत्कृष्ट फलंदाज समाधान दांडेकर, उत्कृष्ट गोलंदाज सचिन थोपटे तसेच फिफ्टी प्लस खेळाडू देवदत्त देशपांडे यांना मालिकावीराचा किताब देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह गणेश कडू, डॉ. संतोष जाधव, डॉ. अमोद दिवेकर, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, मिडटाऊन प्रेसिडेंट कल्पेश परमार, सिटी प्रेसिडेंट मिसेस तन्ना, पंकज पाटील, सिकंदर पाटील, विक्रम कय्या, प्रीतम कय्या, बीकेसी संघाचे मालक भाऊ कोकणे, आदित्य फायटर संघाचे मालक अरविंद सावळेकर यांच्यासह इतर मान्यवर, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

## गुजरातमध्ये ओवैसींच्या सभेत मोदी-मोदीच्या घोषणा

**सुरत : वृत्तसंस्था**

गुजरातमधील विधानसभा निवडणूक जवळ आल्यामुळे प्रचार शिगेला पोहचला आहे. या निवडणुकीत एमआयएमदेखील जवळपास ३० जागांवर निवडणूक लढवणार आहे, मात्र एमआयएमचे सर्वोसर्वा असदुद्दीन ओवैसी यांना येथे विरोध होताना दिसत आहे. त्यांच्या सुरतमधील एका सभेत उपस्थितांनी 'मोदी-मोदी'च्या घोषणा दिल्या. एवढेच नव्हे; तर त्यांना काळे झेंडेही दाखविले.

ओवैसी गुजरातमधील सुरत येथील रुद्रपुरा भागात एका सभेला संबोधित करण्यास आले होते, मात्र त्यांच्या स्वागतावेळी भरसभेत मोदी-मोदीच्या घोषणा देण्यात आल्या तसेच त्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

# शिंदे गटासोबत निवडणुका लढविणार

## भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा



**पुणे : प्रतिनिधी**

बाळासाहेबांची शिवसेना अर्थात शिंदे गट आणि भाजप एकत्रितपणे २०२४ची विधानसभा आणि लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुका लढविल्या जातील, अशी घोषणा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुण्यात बोलताना केली.

भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे पुढे म्हणाले की, २०२४मध्ये होणाऱ्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुका भाजप हा शिवसेनेच्या शिंदे गटासोबत युतीद्वारे लढवणार आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवली जाईल. लोकसभेच्या ४५ जागा आणि विधानसभेच्या २००हून अधिक जागा जिंकण्यासाठी आम्ही तयार आहोत.

दरम्यान, गजानन किर्तीकर यांच्या शिंदे गटात प्रवेशाबाबत बावनकुळेंनी या वेळी उद्धव ठाकरेंवर टीका केली. उद्धव ठाकरे यांच्या व्यासपीठावर फक्त चार लोक राहतील. किर्तीकर शिवसेनेसाठी पायी पायी फिरत होते. तरीही त्यांना पक्ष सोडून जावे लागते हे वाईट आहे, असे या वेळी बावनकुळे म्हणाले.

### जितेंद्र आव्हाड यांना पक्षातून निलंबित करा

राष्ट्रवादी काँग्रेस महिला सक्षमीकरणाची चर्चा करते, पण त्यांच्याकडे नैतिकता असेल तर त्या पक्षश्रेष्ठींनी जितेंद्र आव्हाड यांना पक्षातून निलंबित केले पाहिजे, अशी मागणी बावनकुळे यांनी केली. जितेंद्र आव्हाड यांच्या गुन्ह्याचे समर्थन करणाऱ्यांविरुद्धही कारवाई करावी, असेही ते म्हणाले.

# बेलापूर मतदारसंघात आमदार आपल्या दारी उपक्रम

## आमदार मंदा म्हात्रे यांचा सीवूडवासीयांशी संवाद



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांचा आपल्या मतदारसंघातील नागरिकांशी थेट संपर्क व्हावा, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्या याकरिता प्रत्येक प्रभागात आमदार आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन श्री गणेश मैदान, सेक्टर-४८ ए सीवूड येथे करण्यात आले होते.

या वेळी सिडकोचे अतिरिक्त मुख्य अभियंता दीपक हरतळकर, नवी मुंबई महापालिका बेलापूर अधिकारी रमेश राठोड, एमएसईडीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता किरण धनाईत, सहाय्यक अभियंता अतुल दिघे, शिधावाटप निरीक्षक शीतल लाडके, एनआरआय पोलीस अधिकारी तुषार गुरव उपस्थित होते. माजी नगरसेवक भरत जाधव यांनी हा जनता दरबार घेतला होता. सीवूडच्या नागरिकांनी सीबीडी बेलापूर येथे सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज हे व्हायलाच पाहिजे असा ठराव मांडला व तो संमत केला.

मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी, वारंवार स्लॅब कोसळण्याच्या घटना, पार्किंग समस्या, बहूउद्देशीय इमारत उभारणे, उद्यानात होणारे अतिक्रमण, अनियमित पाणी पुरवठा, गर्दुल्ले व चोरांचा वाढता वावर, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सुविधा, अस्वच्छता, रस्त्यांचे काँक्रीट व डांबरीकरण, कचऱ्याची विल्हेवाट, जुन्या मलः निस्सारण वाहिन्या बदलणे, नव्या शाळेच्या इमारतीला गती मिळणे, प्रवाशांकरिता बसची संख्या वाढवणे अशा अनेक विषयांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

या वेळी भाजप महामंत्री विजय घाटे, माजी नगरसेवक भरत जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, मंडळ अध्यक्ष जयवंत तांडेल, विनायक गिरी, रणजित निंबाळकर, कविता जाधव, दळवी तसेच सीवूड्समधील शेकडो नागरिक उपस्थित होते. सीवूड परिसरातील काही समस्या उपस्थित अधिकाऱ्यांमार्फत त्वरित सोडविण्यात आल्या, तर काही समस्या लवकरच मार्गी लावण्यात येतील, असे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सूचित केले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, विकासकामाला सीवूड्सवासियांनीही पाठींबा दिल्यामुळे सर्वप्रथम मी सर्वांचे आभार मानते. नागरिकांच्या सोयींसाठी निर्माण होणाऱ्या हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजला विरोध हा जनतेला केलेला विरोध असून येत्या १५ दिवसांत महापालिकेने सिडकोस रक्कम भरणा केली नाही, तर जनआंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# कृतीशील नागरिकांमुळे नवी मुंबई स्वच्छ –संदीप नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ शहरांच्या यादीत नवी मुंबईची वरच्या स्थानी गणना होते. यात सर्वात मोठा हातभार हा नागरिकांचा आहे. त्यापैकीच एक म्हणजे मॅंग्रोव्हज मार्शल ग्रुप. जो गेल्या अनेक आठवड्यांपासून स्वच्छतेचे काम करीत आहे, असे गौरवोद्गार माजी आमदार संदीप नाईक यांनी काढले.

सेव्ह मॅन्ग्रोव्हस मोहिमेत वाशीचा मोठा किनारा रविवारी (दि. १३) स्वच्छ करण्यात आला. संदीप नाईक यांच्या हस्ते मॅंग्रोव्ह मार्शल टीमचा सत्कार करण्यात आला. मॅंग्रोव्ह मार्शल टिमचे रोहित मल्होत्रा तसेच सामाजिक कार्यकर्ते नीलेश भोजने, अंशु वर्धन आदींसह इतर सदस्य उपस्थित होते.

संदीप नाईक यांनी सांगितले की, खारफुटीच्या स्वच्छतेबाबत लोकांमध्ये जनजागृती झाली, तर आपण खऱ्या अर्थाने आपण पर्यावरणाचा समतोल राखू शकतो.

सेव्ह मॅन्ग्रोव्हस मोहिमेत वाशीच्या सागरकिनारी सफाई




# जासई हायस्कूलमध्ये बाल दिन उत्साहात



**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग विद्यालयात बाल दिन उत्साहात साजरा झाला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून आपल्या अध्यक्षीय मनोगतात चाचा नेहरूंचे भारताच्या जडणघडणीत असलेले योगदान आणि त्यांचे प्रेरणादायी चरित्र सांगितले. विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील यांनीही पंडित नेहरूंचे जीवनकार्य आपल्या मनोगतातून मांडले.

रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख यांनी श्रीफळ वाढवून मुलांच्या लाडक्या चाचा नेहरूचे बालपण मनोगतातून सांगितले. या कार्यक्रमावेळी विद्यालयातील दक्षता खिल्लारे, हिमांशी शुक्ला, योगिता होलंबे, साक्षी मुळे, अंकिता पवार या विद्यार्थ्यांनी चाचा नेहरूंवर आपले विचार प्रकट केले. हा कार्यक्रम इयत्ता सातवी 'ब' या वर्गाने आयोजित केला होता आणि त्या वर्गाच्या वर्ग शिक्षिका के. के. म्हात्रे यांनीही पंडित नेहरू यांच्यावर विचार प्रकट केले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

### उरण करंजात उद्या मोफत वैद्यकीय शिबिर

**उरण : वार्ताहर**

भारतीय नौदल हॉस्पिटल शिप संधानी, नेव्हल स्टेशन करंजा यांच्या वतीने बुधवारी (दि. १६) सकाळी ९ वाजता उरण एज्युकेशन सोसायटी स्कूल येथे वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन सर्जन ॲडमिरल अनुपम कपूर, एनएम कमांडिंग ऑफिसर आयएनएचएस अश्विनी यांच्या हस्ते होणार आहे.

या शिबिरात हृदयरोग, त्वचा, बालरोग, दंतचिकित्सा, रक्त तपासणी, इएनटी,हायपरटेन्शन, डायबेटीस आदी तपासण्या करण्यात येणार आहेत. सर्व नोंदणीकृत रुग्णांची हायपरटेन्शन, डायबेटीस मेलिटस आणि ॲनिमियासोबत एन्थ्रोपोमेट्री, हेमोग्राम, बायोकेमिस्ट्री आणि इलेक्ट्रोकार्डियोग्राम मूल्यांकनासाठी तपासणी केली जाईल.

# वडगावमध्ये आरोग्य तपासणी शिबिर





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा हद्दीतील बोरिवली येथील नोवेझाइन्स साऊथ एशिया प्रा. लिमिटेड आणि अनार्डे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वडगाव साईनगर येथील नागरिकांसाठी सोमवारी (दि. १४) मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी १०१ महिलांची आपली आरोग्य तपासणी करण्यात आली.

रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, डोळ्यांची तपासणी, अशक्तपणा, अल्पदरात चष्मे, महिलांसाठी मासिक पाळी आरोग्य सल्ला आदी तपासण्या करण्यात आल्या. डोळ्यांचे आजार असणाऱ्या नागरिकांना अल्प दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

डॉ. पूजा पारधी, डॉ. लेखा उचिल यांनी महिलांना आजाराविषयी मार्गदर्शन केले. महिलांना सॅनिटरी नॅपकीन मोफत वाटप करण्यात आले. या वेळी डेन्मार्कवरुन नोवेझाइन्स मॅनेजमेंटची टिम, नोवेझाइन्स व्यवस्थापन डायरेक्टर संजय सूर, विनायक पाठक, मिनल गडगे आदी उपस्थित होते.

### नवीन पनवेलमध्ये तरुणाची आत्महत्या

**पनवेल :** नवीन पनवेल परिसरातील राहत्या घरात २३ वर्षीय तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली. रूपेश विश्वास यमगर (रा. श्री सिद्धी गणेश सोसायटी सेक्टर ६, नवीन पनवेल) असे या तरुणाचे नाव आहे. स्विगीमध्ये कामाला असलेल्या रूपेशने अज्ञात कारणावरून घरातील पंख्याला नायलॉनची दोरी बांधून त्याला गळफास घेतला. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# विश्वचषक स्पर्धेवर सट्टा लावणाऱ्या तिघांना अटक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ऑस्ट्रेलियात पार पडलेल्या टी-ट्वेन्टी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यावर सट्टा लावणाऱ्या तिघांना रायगड पोलीसांनी जेरबंद केले आहे. रायगडच्या स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने ही कारवाई केली असून अलिबाग पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दी रविकिरण हॉटेल येथे काही लोक इंग्लड विरुद्ध पाकीस्तान सामन्यासाठी सट्टा लावणार असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांच्या पथकाने रविवारी (दि. १३) रविकिरण हॉटेलमध्ये छापा टाकला. या वेळी दोन आरोपी विश्वचषक सामन्यासाठी चालू असलेल्या अंतिम सामन्यावर त्यांच्याकडील मोबाईलवर सट्टा लावून खेळत असल्याचे आढळून आले. अँड्रॉ रिचर्ड फेर्नांडिस (३८ रा. सांताक्रुज), मानिष दौलत टुकरेल (४२ रा. अंधेरी) आणि राजेंद्र वडलदास भाटिया (रा. शास्त्रीनगर, मुंबई) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. तिघांकडून पाच हजार रुपयांची रक्कमही जप्त करण्यात आली आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता तिघांनाही न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

पान १ वरून

### खारघरमध्ये वर्ल्डकप फायनलवर जुगार

हे चौघे आपापसात संगनमत करून लोकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने व स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता विविध वेबसाईट व ॲपद्वारे क्रिकेट सामन्याच्या हार-जीतवर सट्टा लावताना व घेताना करताना आढळले.

आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले सॅमसंग तसेच ॲपल कंपनीचे एकूण २२ मोबाइल फोन, लेनोव्हो कंपनीचे दोन लॅपटॉप, एक वायफाय राउटर असा एकूण सात लाख ४५ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून, अधिक तपास सुरू आहे.

# जेएनपीए कामगार संचालकपदासाठी आज निवडणूक

## ६५२ कामगार बजावणार मतदानाचा हक्क

**उरण : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने बंदर कायद्यात बदल करून जेएनपीटी बंदराचे २०२१मध्ये पोर्ट ट्रस्टऐवजी पोर्ट ऑथोरिटीत रूपांतरण केले असून जेएनपीए बंदराच्या दोन कामगार संचालकांची पहिली निवडणूक मंगळवारी (दि. १६) होणार आहे. या निवडणुकीत चार प्रमुख कामगार संघटना निवडणूक लढवीत आहेत. एकूण ६५२ कामगार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट १९८९मध्ये सुरू झाले आहे. या बंदराचे कामकाज पाहण्यासाठी असलेल्या विश्वस्त मंडळात व्यवस्थापनासह दोन



कामगार विश्वस्तांची ही निवड केली जात होती. १९९९मध्ये सीआयटीयु या कामगार संघटनेने केलेल्या मागणीनुसार कामगार विश्वस्त गुप्त मतदानाने निवडण्यात येऊ लागले. २०२१मध्ये मेजर पोर्ट ॲक्टमध्ये बदल करून ट्रस्ट रद्द केल्यानंतर ही निवडणूक होत आहे. त्यामुळे या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

केंद्रीय कामगार आयुक्तांच्या देखरेखीखाली होणाऱ्या या निवडणुकीत जेएनपीए बंदरातील एकूण ६५२ कामगार मतदान करणार आहेत. यामध्ये न्हावाशेवा बंदर (अंतर्गत)कामगार संघटनेचे माजी कामगार विश्वस्त भूषण पाटील, जेएनपीटी एकता कामगार संघटनेचे दिनेश पाटील व जेएनपीटी वर्कर्स युनियचे रविंद्र पाटील या तीन प्रमुख कामगार संघटनांमध्ये निवडणुकीची चुरस सुरू आहे. जेएनपीएच्या १३ संचालकांपैकी मंडळात दोन कामगार प्रतिनिधी निवडले जाणार आहेत.

# बोरिवलीत घराणा रंग संगीत संवादात्मक कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध सतारवादक उस्ताद अझीम खान यांच्या संकल्पनेनुसार बोरिवलीतील प्रबोधनकार ठाकरे लघुनाट्यगृहात झालेल्या 'घराणा रंग' या संगीत संवादात्मक उत्सवात पनवेलचे सुपूत्र तथा सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष संगीत विशारद रायगडभूषण उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. संगीतशास्त्र सौंदर्य तत्त्व आधारित संकल्पनेला उजाळा देणारा कार्यक्रम ठरला.




शास्त्रीय संगीत साधनेचा जागर नवीन पिढीला अवगत व्हावा, यासाठी नादब्रह्म परिवार बोरिवलीच्या वतीने उमेश चौधरी यांच्या संगीत सूरमयी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रख्यात गायक उमेश चौधरी, संगीतशास्त्र तज्ज्ञ उस्ताद अजीम खान आणि संगीत रत्नाकर ग्रंथाचे निष्णात प्राचार्य विजया पाटील यांच्या सहभागाने झालेल्या या संगीत कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रागदारी संगीतामधील अविर्भाव, तिरोभाव या संगीत सौंदर्य तत्त्वांचे महत्व आणि त्याचे विश्लेषण उमेश चौधरी यांच्याकडून संगीत श्रोत्यांनी जाणून घेतले. या वेळी उमेश चौधरी यांना तबल्यावर किशोर पांडे, पखवाज सुनील म्हात्रे, संवादिनीवर भक्ती ब्रहो घैसास, तानपुरा मंगेश चौधरी, अक्षय चौधरी तर टाळवर मधुरा म्हात्रे यांची साथ लाभली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात गायिका विदुषी अर्चना कान्हेरे, सतारवादक उस्ताद अजीम खान, सरोद वादक विवेक जोशी, विदुषी लता रानडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन

**अलिबाग :** भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला जिल्हाधिकारी कार्यालय येथे तहसिलदार विशाल दौंडकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, मौजे-पागोटे, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादीत केलेल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-पागोटे, ता. उरण, जि. रायगड.**

| यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| ९९/१९८३ | ६६ | ६ | ०-१०-१२ |
| २२४/१९८६ | ६३ | ४ | ०-१३-०० |
| | ३३ | २अ | ०-०४-०० |
| | ९० | ६ | ०-१३-०० |
| | ९६ | ३अ | ०-३०-४० |
| २२५/१९८५ | २६ | २ | ०-०८-४० |
| | ९९ | ६ | ०-१७-३० |
| | ११८ | १ | ०-०८-१० |
| | ४० | ५ | ०-१७-८ |

वर नमुद संपादीत मिळकतीपोटी सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे **श्री. प्रमोद प्रभाकर कडू, श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण कडू, श्री. दिनकर लक्ष्मण कडू, श्री. नरेश लक्ष्मण कडू, श्री. यशवंत लक्ष्मण कडू यांना मौजे-द्रोणागिरी, ता. उरण, जि रायगड येथे अंदाजे १००० चौ.मी.** क्षेत्राचा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे. आमचे अशिल सदर भूखंड **श्री. प्रमोद प्रभाकर कडू, वगैरे** यांच्याकडून मोबदल्यापोटी त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इराद्यात आहेत.

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : १४/११/२०२२

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ.**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

# पनवेल, उरणमध्ये बाल दिन उत्साहात

## लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये चित्रकला स्पर्धा | दिशा महिला मंचचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

दिशा महिला मंच आयोजित बाल दिन विशेष भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन रांगोत्सव सेलिब्रेशनच्या सहकार्याने कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व जुनिअर कॉलेज येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये ४७० मुलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता चार गटामध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येकी विजेत्या स्पर्धकास मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, सन्मानपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.



या वेळी कार्यक्रमास लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व जुनिअर कॉलेजच्या प्राचार्य स्वप्नाली संजय म्हात्रे व संजय म्हात्रे, तसेच आरके ग्रुपचे राजेंद्र कोळकर, श्रीकृष्णा चाईल्ड व डेंटल क्लीनिकचे डॉ. संतोष कानगुले तसेच पत्रकार उत्कर्ष समितीचे सचिव शैलेश ठाकूर उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी बाल दिनाच्या शुभेच्छा देत मुलांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेचे परीक्षण रेखा ठोंबरे, व प्रोफेसर नितीन ताराचंद निकम यांनी केले. भव्य दिव्य अशी स्पर्धा व्यासपीठाच्या संस्थापक निलम आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव खुशी सावर्डेकर व इतर हिरकण्याच्या सहकार्याने झाला. या वेळी निरव नंदोला, अल्पेश माने, प्रशांत कुंभार, अरुण जाधव यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले.

व्यासपीठाच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर व्यासपीठाच्या हिरकणी रुक्मिणी अर्जुन, नीलिमा सहाणे, दिक्षा ढोणे, वंदना वाघमोडे, पूनम शेलार, गीता कुडाळकर, अनिता मागाडे, मनिषा शिंदे, स्नेहल चेलेकर, सोनल, विभावरी, शिल्पा आदींच्या सहकार्याने बाल दिनाचा कार्यक्रम झाला. चार गटातील या स्पर्धेत दिविषा घोडेश्वर, ओवी दूधवडकर, स्वयंम शेट्टी, समृद्धी मनसुखे यांनी प्रथम क्रमांक पटकला तर आरोही तेल्हार, स्वरा पवार, दुर्वा जाधव, आर्यन कदम यांनी द्वितीय, तसेच रियांश नाईक, पलश म्हात्रे, अमृता खांडगे, लतीका बाग या विद्यार्थांनी तृतीय क्रमांक पटकवला तसेच रिवांश खांडगे, मृण्मयी नांदगावकर, संचीता दैने व क्षितिज जगताप या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

## महापालिकेच्या शाळांमध्ये विविध कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या ११ शाळांमध्ये बाल दिनानिमित्ताने पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन करून विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,समुहगीत स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

लोकनेते दि. बा. पाटील शाळेमध्ये इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्यावतीने बालदिनानिमित्त खाऊचे वाटप करण्यात आले. शिक्षण विभाग प्रमुख बाबासाहेब चिमणे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या सर्वच शाळांमधील मुलांनी यानिमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.





दरम्यान, पालिकेच्या मुख्यालयात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, कैलास गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखापरिक्षक विनयकुमार पाटील, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**कामोठे : लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, सहाय्यक इन्स्पेक्टर शहाजी फडतरे, अर्चना खाडे उपस्थित होते.**

## चांगू काना ठाकूर विद्यालयात लोकनृत्य स्पर्धा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी पर्यवेक्षिका संध्या अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलात बाल दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी लोकनृत्य स्पधेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी विविध राज्यामधील लोकनृत्य अतिशय सुंदर पद्धतीने सादर केले.



(छाया : अक्षय शार्दुल)

सुरुवात सरस्वती व पंडित नेहरू यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, ज्युनिअर कॉलेज कला, विज्ञान आणि वाणिज्य विभागोच पर्यवेक्षक प्रशांत मोरे, इंग्रजी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी पूर्वप्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका संध्या अय्यर आदी उपस्थित होते.



## गव्हाण विद्यालयात पंडित नेहरूंना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू अर्थात बालकांचे चाचा नेहरू यांचा जन्मदिन देशभर बाल दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातो. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनियर कॉलेजमध्येही पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन बालदिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता सहावी 'अ' या वर्गातील बालकांनीच हा उत्सव साजरा केला.

प्रारंभी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन सुयशा पाटील यांनी केले तर सहावी 'अ' या वर्गातील विद्यार्थ्यांनीच श्रीफळ वाढवले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाच्या सहायक हर्षाला पाटील यांनी केले. इयत्ता सहावी 'अ' या वर्गाच्या वतीने कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले. या वर्गाच्या वर्गशिक्षिका अपर्णा देवकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आखीव नियोजन केले.

या वेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडत्या चाचा नेहरूंना अभिवादन केले.

या कार्यक्रमास विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांच्यासह रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, शिक्षक व शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**उरण : द्रोणागिरी येथील इम्पेरीयल सेक्युरिटी ॲण्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट ॲण्ड इम्पेरीयल इंटरप्रायजेसचे उद्घाटन शनिवारी आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. या वेळी नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस अधिकारी, भाजप शहराध्यक्ष कौशिक शाह, नूर सोंडे, रेय्यान तुंगेकर, तशीर तुंगेकर, नयीम कर्वेकर, अन्वर तुंगेकर, नगरसेवक राजेश ठाकूर, मेराज शेख, रायगड जिल्हा अल्पसंख्याक सेलचे जसिम गॅस आदी उपस्थित होते.**



**पनवेल : अवधेश अयोध्या कुमार यांची भाजप उत्तर भारतीय मोर्चाच्या उलवे नोड अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याचे नियुक्तीपत्र अवधेश कुमार यांना भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी उत्तर भारतीय मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र तिवारी, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील तसेच शांताराम पाटील, संतोष शेळके, ॲड. सुनील कुमार आदी उपस्थित होते.**



**पनवेल : काळुंद्रे गावात असलेल्या व्यायामशाळेची अवस्था दयनीय झाली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यायामशाळेची पाहणी केली. या व्यायामशाळेची लवकरच डागडुजी आणि रंगरंगोटी करण्याचे आश्वासन ग्रामस्थांना देण्यात आले आहे. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी सरपंच हेमलता म्हात्रे, बाळा चिखलेकर, सचिन चिखलेकर, विशाल म्हसकर आदी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)

# खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे राष्ट्रीय पुरस्काराबद्दल अभिनंदन

## प्राचार्या राज अलोनी यांचा सत्कार



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला भारत सरकारच्या वतीने स्वच्छ विद्यालय राष्ट्रीय पुरस्कार २०२१-२२ बहुमान मिळाला आहे. याबद्दल भाजप खारघर-तळोजा मंडलच्या उपाध्यक्ष बीना गोगरी यांनी शाळेला भेट देऊन प्राचार्य राज अलोनी यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

या राष्ट्रीय पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून एक लाख तीन हजार शाळांनी नामांकन केले होते. त्यामधून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर राज्य पातळीवर प्रथम क्रमांक पटकाविल्यानंतर महाराष्ट्र राज्यातून रामशेठ ठाकूर स्कूलची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. राष्ट्रीय स्तरावर एकूण ६०६ शाळांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. त्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरला भारत सरकार व युनिसेफ यांच्यातर्फे राष्ट्रीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२१-२२ जाहीर करण्यात आला आहे.

प्राचार्य अलोनी यांच्या सत्कारावेळी गोगरींसोबत अंजू पटेल, सुशीला शर्मा, समता मोदी, निर्मला यादव, प्राची देशपांडे आदी उपस्थित होत्या. या सर्वांनी शाळेचे कौतुक करून या यशासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, शाळा व्यवस्थापन समिती, शाळेचे शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनादेखील शुभेच्छा दिल्या.

> **खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला स्वच्छ विद्यालय राष्ट्रीय पुरस्कार मिळणे आहे हा आम्हा सर्व खारघरवासीयांसाठी अभिमानाचा क्षण आहे.**
>
> **-बीना गोगरी, उपाध्यक्ष, भाजप खारघर-तळोजा मंडल**

# भाजपतर्फे आदिवासी बांधवांची नृत्य स्पर्धा

## भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे औचित्य





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आणि जनजाती गौरव दिनानिमित्त वनवासी कल्याण आश्रम व भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील वाकडी येथे आदिवासी बांधव नृत्य स्पर्धा मोठ्या उत्साहात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेला भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट देत भगवान बिरसा मुंडा यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजप पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, दुंदरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील, सरपंच अनुराधा वाघमारे, वाकडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नरेश पाटील, मालडुंगी ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा चौधरी, आदिवासी समाजाच्या जिल्हाध्यक्षा ठमाताई पवार, नामदेव जमदाडे, राजेश भोईर, भगवान पाटील, शांताराम चौधरी, राजेश पाटील, संदीप शिंदे, नारायण भगत, सोमनाथ चौधरी, रामदास शेळके, विकास भगत, जोमा निरगुडा, उदय टिळक, सुदाम पवार, पदु वाघ, रूपेश भोईर, जनार्दन निरगुडा आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

# नियमानुसार चौकशी हवी


प्रदीर्घ काळ लोकप्रतिनिधी असलेल्या एका नेत्याला गर्दीच्या ठिकाणी एखाद्या महिलेशी कुठल्या तऱ्हेचे वर्तन अशोभनीय ठरू शकते याचे भान नसावे? वास्तविक जितेंद्र आव्हाड यांचा पक्ष हा स्त्रियांचा मानसन्मान आदी बाबतीत नेहमीच ठाम भूमिका घेताना दिसतो. याखेपेला मात्र त्यांना आव्हाड यांच्या वर्तनात काहीच गैर वाटू नये हे अचंबित करणारे आहे. किमानपक्षी पोलिसांकडून नियमानुसार चौकशी पूर्ण होण्याइतपत वेळ तरी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांनी आपली भूमिका मांडण्यापूर्वी द्यायला हवा होता.

**एखादी नामांकित व्यक्ती वारंवार वादात अडकत असेल तर तिच्या संदर्भात ‘कॉन्ट्रोव्हर्सीज फेवरिट चाइल्ड’ असा उल्लेख केला जातो. एखादी घटना अन्य कुणाच्या संदर्भात घडली तर त्याला वेगळा न्याय आणि नामांकित व्यक्तीच्या संदर्भात घडली तर त्या व्यक्तीस अधिक कठोर न्याय असा काहीसा प्रकार होत असल्यामुळे विशेषत: चित्रपट जगतातील वारंवार वादात अडकणाऱ्या लोकप्रिय सिताऱ्यांच्या संदर्भात ही संकल्पना वापरली जाते. आमदार जितेंद्र आव्हाड यांचे सध्या असे काही झाले आहे की, काय असा प्रश्न पडावा इतके वारंवार ते वादात अडकत आहेत. त्यांच्यासंदर्भातील ताज्या दोन्ही वादग्रस्त प्रकरणांत सुस्पष्ट व्हिडिओ क्लिप्स ताबडतोबच समोर आल्यामुळे खरे तर त्यांना ‘अकारण’ वादात ओढले जात आहे असे म्हणण्यासारखी परिस्थिती नाही, परंतु त्यांनी स्वत: मात्र तातडीने ‘व्हिक्टिम कार्ड’ खेळायला घेतले आहे. आपण काहीच केले नसून आपल्यावर अकारण भीषण अन्याय होत असल्यामुळे आपण आमदारकीचा राजीनामा देणार आहोत असा पवित्रा जितेंद्र आव्हाड यांनी सोमवारी घेतला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील तमाम ज्येष्ठ नेत्यांची फौज त्यांच्या समर्थतार्थ जोमाने पुढे सरसावली. ठाण्यातील कार्यक्रमस्थळी मुख्यमंत्र्यांच्या गाडीभोवती जमलेल्या गर्दीत स्वत:साठी वाट काढत असताना त्यांनी एका महिलेला दंडाला धरून बाजूला केले हे व्हिडिओ क्लिपमध्ये स्पष्ट दिसते. या महिलेने नंतर विनयभंगाची तक्रार दाखल केली. आव्हाड यांची कृती ही विनयभंग ठरते वा नाही याचा निर्णय पोलिसांकडून नियमानुसार चौकशी होऊन घेतला जायला हवा. किंबहुना, तशी नियमानुसार चौकशी व्हायला हवी अशी भूमिका सत्ताधारी पक्षांपैकी भारतीय जनता पक्षाने सुस्पष्टपणे घेतली आहे. नियमानुसार पोलिसांकडून झाल्या प्रकाराची चौकशी होईल, त्यात कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप आपल्याकडून होणार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही स्पष्ट सांगितले आहे. आव्हाड यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मात्र हा विनयभंग दिसत नाही असा निर्वाळा देऊन मोकळे झाले आहेत. आपल्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर आव्हाड यांनी सोमवारी विरोधी पक्षनेते अजित पवार यांची भेट घेतली. त्यानंतर अजित पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन शिंदे-फडणवीस सरकारवर टीका केली. मुख्यमंत्री घटनेवेळी तिथेच होते, त्यामुळे त्यांनी याप्रकरणी स्पष्ट भूमिका घ्यायला हवी होती असे त्यांनी म्हटले. वास्तविक घटना घडली तेव्हा गाडीत बसलेले मुख्यमंत्री व्यस्त असल्याचेही स्पष्ट दिसते. आव्हाड यांनी संबंधित महिलेला कशातऱ्हेने पकडून वाटेतून बाजूला केले हे चित्रफीतीत स्पष्ट दिसते. विनयभंग किंवा तत्सम गुन्ह्यांमध्ये सीमारेषा फार धुसर असतात. स्त्रियांच्या सन्मानाच्या रक्षणासाठी बनवलेले हे कायदे त्यासंदर्भात वेळीअवेळी समाजधुरिणांनी घेतलेल्या जाहीर भूमिकांमुळे प्रभावहीन ठरू नयेत याची जबाबदारीही या धुरिणांवर असतेच. त्यासंदर्भात राष्ट्रवादी पक्षाकडून निश्चितच अधिक प्रगल्भ प्रतिक्रियेची अपेक्षा होती असे खेदाने नमूद करावेसे वाटते.**

# राष्ट्रीय लोक अदालत जनतेसाठी आवश्यक







विविध कारणांसाठी न्यायालयीन प्रकरणे अनेक वर्षे पडून असतात. त्यांना उशीरा न्याय मिळतो. जलद न्याय व निपटारा यासाठी लोक अदालतीची महत्त्वाची भूमिका असते. लोक अदालत एक असे व्यासपीठ आहे, जिथे ग्राहक न्यायालयातील प्रकरणे सामंजस्याने सोडवले जातात. लोक अदालत ही राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणद्वारे आयोजित करण्यात येते. या मागचा उद्देश ग्राहकांना न्याय आणि कार्यक्षम तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करून देणे हा आहे. विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७अंतर्गत लोक अदालतीला घटनात्मक दर्जा देण्यात आला आहे. राष्ट्रीय लोक अदालत म्हणजे संपूर्ण देशात एकाच दिवशी सर्व न्यायालयांमध्ये भरविण्यात येणारी अदालत. ही राष्ट्रीय लोक अदालत महात्मा गांधींच्या तत्त्वांवर आधारित आहे. वाद उद्भवला तर तो शक्यतोवर सामंजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा. गावातील जुनी-जाणती माणसे म्हणजेच पंच एकत्र येत आणि गावातील गावकऱ्यांमध्ये उद्भवलेला कुठल्याही स्वरूपाचा वाद समजुतीने दोन्ही पक्षांचे म्हणने ऐकून योग्य तो निर्णय देऊन वाद मीटवीण्यात येई. ज्यांच्यापुढे वाद नेला जाई ते त्या गावातील आदरणीय आणि नि:पक्षपाती लोक असत. यालाच गाव-पंचायत असे म्हणत. सध्याचे लोक न्यायालय म्हणजे या गाव पंचायतीचेच आधुनिक रूप आहे. जेथे कायद्याचे सुज्ञ ज्ञान असलेल्या नि:पक्षपाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने तडजोड घडवून योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न करतात.

प्रत्येक जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी दोन महिन्यातून किमान एकदा व आवश्यक भासल्यास त्याहून आधीक वेळा योग्य त्या सूचना देऊन त्या-त्या न्यायालयांमध्ये लोकन्यायालयाचे आयोजन केले जाते. जिल्ह्याच्या ठिकाणी होणारी लोकन्यालये जिल्हा न्यायालयात तर तालुक्याच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये तालुका कोर्ट परिसरात भरविली जातात. उच्च न्यायालयामध्ये मुंबई येथे तसेच नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाच्या ठिकाणी देखील लोकन्यायालये भरविली जातात. महाराष्ट्रातील जवळपास सर्व जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांच्या ठिकाणी कायम व अखंडित लोकन्यायालये स्थापित झाली आहेत. तेव्हा दर दोन महिन्यांनी अथवा विशिष्ट कालांतराने होत असलेल्या लोकन्यायालयाची आता नागरिकांना वाट पाहण्याचीही आवश्यकता नाही.

राष्ट्रीय लोक अदालतीचे नियोजन शनिवारी (दि. १२) करण्यात आले होते. कोकण विभागांतर्गत असलेल्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यात एकूण एक लाख ६८ हजार ७०६ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी ३० हजार ८५२ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीसामोर सादर करण्यात आली. रायगड जिल्ह्यात एकूण ५७ हजार ८९६ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबीत असून त्यापैकी ४७ हजार ७५९ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीसामोर सादर करण्यात आली. रत्नागिरीत एकूण १६ हजार १५३ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबीत असून त्यापैकी दोन हजार ७३२ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीसामोर सादर करण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण १० हजार ८५४ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी तीन हजार १०५ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीसामोर सादर करण्यात आली आणि मुंबईत एकूण तीन लाख आठ हजार ५०३ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबीत असून त्यापैकी ३७ हजार ९९९ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीसामोर सादर करण्यात आली.

लोकन्यायालयाचे आयोजन विधिसेवा प्राधिकरणामार्फत केले जाते. राज्य व जिल्हा विधी सेवा समित्या व उच्च न्यायालय विधी सेवा समित्यांद्वारे विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७मधील तरतुदी अंतर्गत लोकन्यायालयांचे वेळोवेळी आयोजन केले जाते. लोकन्यायालयाची तारीख सामान्यतः एक महिना अगोदर जाहीर करण्यात येते. लोकन्यायालय देखील एकाअर्थी कोर्टच आहे. उलटपक्षी कोर्टात जेथे तुमच्या खटल्याच्या निवाड्यासाठी एकच न्यायाधीश असतात, तर लोकन्यायालयात किमान तीन कायदे तज्ज्ञ व्यक्तींचे पॅनेल न्यायाधीशांची भूमिका बजावते. कार्यारत अथवा निवृत्त ज्येष्ठ न्यायाधीश पॅनेलचे प्रमुख म्हणून तर अनुभवी वकील अथवा कायद्याच्या जाणकार व्यक्ती सदस्य म्हणून लोकन्यायालयाचे काम पाहातात.

लोकन्यायालयासमोर प्रकरण सादर करण्यासाठी ज्या न्यायालयात आपला खटला प्रलंबित आहे, तेथे एक साधा अर्ज देऊन प्रकरणाच्या कुठल्या टप्प्यावर आपण आपला खटला लोक न्यायालयापुढे नेऊ शकतो असा अर्ज आल्यावर न्यायाधीश दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतात व दाव्यातील वाद आपसात समजुतीने निर्णयी लागू शकेल असे मत झाल्यास प्रकरण लोक न्यायालयापुढे ठेवण्याचा आदेश करतात. दावा व कैफियतीतील कथनावरून संबधित न्यायाधीशांना प्रकरणाची आपसात समजुतीने मिटण्याची शक्यता वाटली, तर कुठल्याही पक्षाचा अर्ज नसला तरी न्यायाधीश स्वत:हून खटला लोकन्यायालयाकडे वर्ग करू शकतात.

लोक अदालतीमुळे नागरीकांना विविध फायदे होत आहेत. जसे की, लोक दालतीत वाद प्रकरणांचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा उलट तपासणी-दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुद्ध वेगळी अपील केली जात नाही. एकाच निर्णयात न्यायालयीन प्रक्रियेतून कायमची सुटका होते. लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपापसात समजुतीने होत असल्याने सर्व पक्षांचा विजय होतो. लोक न्यायालयात दिलेला निर्णय हा दोन्ही पक्षांना समाधान देतो. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांमधील द्वेष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच लोक न्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. नागरिकांच्या वेळ आणि पैसा या दोन्हींचीही बचत होते. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फीची रक्कम परत मिळते. या सर्व जमेच्या बाजूमुळे लोक अदालतीला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

राष्ट्रीय लोक दालतीत सर्व प्रकारची दिवाणी प्रकरणे, चेक बाउन्स प्रकरणे, बँकवसुली प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज पाणी व कर यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, नोकरी बाबातची प्रकरणे ज्यात वेतन, इतर भत्ते व सेवानिवृत्तीनंतरचे लाभ, महसूल बाबतची प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण आयोगासमोरील प्रकरणे अशा प्रकारची सर्व प्रकरणे लोक अदालतीत घेतली जातात.

**-प्रविण डोंगरदिवे, उपसंपादक,**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

# सॅटेलाइट इंटरनेट म्हणजे काय रे भाऊ?

आपल्या देशाचा प्रवास आता ४जीवरून ५जीच्या दिशेने सुरू झालाय. आता या ५जीनंतर काय? तर ५जीनंतर सॅटेलाइट इंटरनेट घेऊन येण्याची तयारी जगातल्या बड्या आसामिंनी चालवलीय. हे सॅटेलाइट इंटरनेट बऱ्याच देशांमध्ये सुरू असून एलॉन मस्कची कंपनी स्टारलिंक अनेक देशांमध्ये सॅटेलाइट इंटरनेट सुविधा पुरवत आहे.



बिझनेस स्टँडर्डच्या रिपोर्टनुसार, सॅटेलाइट इंटरनेट तंतोतंत सॅटेलाइट टीव्हीप्रमाणेच काम करते, म्हणजे वायरलेस पद्धतीने. पृथ्वीवर आणि अंतराळात सॅटेलाईट डिश असतात. शहरात असो वा गावातील दुर्गम भागात, सगळीकडेच याला नेटवर्क मिळते. त्याचप्रमाणे देशातील ज्या भागात मोबाईल टॉवर नाहीत, त्या भागातसुद्धा सॅटेलाइट इंटरनेट पोहचेल. सॅटेलाइट इंटरनेटच्या मदतीने शहरासह गावातील दुर्गम भागात इंटरनेट पोहचवले जाईल.

सॅटेलाइट इंटरनेट देण्यासाठी कंपनी स्वत:चा अँटेना देईल, ज्याच्या मदतीने यूजरपर्यंत इंटरनेट पोहचेल. इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर सॅटेलाईटला सिग्नल पाठवेल, तेथून अँटेनाद्वारे सिग्नल पोहचेल. त्यानंतर वायरलेस राउटरच्या मदतीने हे मोडेम इंटरनेटच्या रूपात लोकांच्या डिव्हाईसपर्यंत पोहोचेल आणि यात विशेष काय असेल तर ग्रामीण भागात सॅटेलाइट इंटरनेट देण्यासाठी वायरचे जाळे टाकावे लागणार नाहीये. थोडक्यात गावागावात इंटरनेट पोहोचवणे खूप सोपे होईल.

सॅटेलाइट इंटरनेट आल्याने खेड्यांमध्ये डिजिटल सर्व्हिसेस वाढतील. विद्यार्थी डिजिटल शिक्षणाचा भाग बनू शकतील. इंटरनेटच्या अभावी शहरांकडे जाणारे गावकरी गावात राहूनच संबंधित कामांमध्ये प्रगती करतील. इंटरनेटची व्याप्ती वाढल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेवरही सकारात्मक परिणाम होईल. याशिवाय हे सॅटेलाइट इंटरनेट आपत्कालीन परिस्थितीत खूप उपयुक्त ठरेल. असे असले जसे खराब हवामानामुळे टीव्ही कनेक्शन डिस्टर्ब होते अगदी त्याचप्रमाणे सॅटेलाइट इंटरनेटवरही परिणाम होतो. सॅटेलाईटशी जोडल्यामुळे हवामानाचा परिणाम या इंटरनेटवरही दिसणार आहे.

# चतुरस्त्र कवयित्री शिरीष पै

## निमित्त



लेखिका आणि कवयित्री शिरीष व्यंकटेश पै यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९२९मध्ये मुंबई येथे झाला. आचार्य अत्रे हे त्यांचे वडील. पती व्यंकटेश पै हे वकील होते.

शिरीष पै यांनी कथा, कविता, नाटक, ललित लेखन अशा सर्व प्रकारच्या साहित्यात उल्लेखनीय योगदान दिले. कारकिर्दीच्या सुरुवातीला त्यांनी आचार्य अत्रे यांच्या ’मराठा’मध्ये पत्रकार म्हणून काम केले होते. त्या बीए. एलएलबी होत्या. त्या १९५६ ते १९६० या काळात नवयुग साप्ताहिकाच्या, १९६१ ते १९६९ या काळात दैनिक मराठाच्या वाङ्मयीन पुरवणीच्या, आणि १९६९ ते १९७६ या काळात दैनिक ’मराठा’च्या संपादक होत्या. वृत्तपत्रांतून त्यांचे अग्रलेख. पुस्तक परीक्षणे, मुलाखती आणि वाङ्मयीन लेख प्रसिद्ध होत असत. त्यांनी आयुष्याची २५ वर्षे वृत्तपत्र व्यवसायात घालवली. त्यामुळे स्फुटलेखनाची त्यांना सवय होती. त्यांनी राजकीय लेखनही केले.

शिरीष पै एक चांगल्या वक्त्या होत्या. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही त्यांनी प्रखर भूमिका निभावली. त्या बोलताना निरागसपणे बोलायच्या, मात्र, त्या बोलण्यामध्ये खूप अर्थ असे. त्यांची भाषा प्रगल्भ होती. नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी नवयुगच्या माध्यमातून कथा आणि कविता लेखन स्पर्धांचे आयोजन केले. त्यातून अनेक लेखक, कवी, पत्रकार उदयाला आले. त्यांनी ललित लेखकांनाही प्रोत्साहन दिले. वडिलांना न पटलेल्या एका लेखकाकडे पाहण्याचा वडिलांचा दृष्टिकोन बदलण्यात त्या यशस्वी ठरल्या. त्यांची वडिलांवर प्रचंड श्रद्धा, प्रेम आणि त्यांच्याप्रती आदर होता.

शिरीष पै यांनी सन १९७५मध्ये ‘हायकू’ हा जपानी अल्पाक्षरी काव्यप्रकार मराठीत आणला आणि लोकप्रिय केला. शिरीष पै या ओशोंच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झाल्या होत्या. त्यांनी ’प्रतिभावंत ध्यानयोगी ओशो’ या पुस्तकाचे लेखन केले आहे. त्यांचे एकूण १४ कथासंग्रह असून कांचनगंगा, खडकचाफा, चैत्रपालवी हे त्यातील काही प्रमुख. शिवाय एकूण २० काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. कस्तुरी, एकतारी, एका पावसाळ्यात, चंद्र मावळताना आणि विविध हायकूसंग्रह यांचा त्यांत समावेश आहे. कविता सादर करण्याची त्यांची हातोटी अनोखी होती. त्या नाट्यपूर्ण पद्धतीने कविता सादर करायच्या. त्या काळात शिरीष पै, शांता शेळके, वृंदा लिमये, पद्मा लोकूर, निर्मला देशपांडे या कवयित्रींशिवाय काव्यसंमेलन रंगायचे नाही. या सगळ्यांची वेव्हलेंथ छान जुळायची. त्यामुळे हे मैत्र खास होते. त्यांच्या काव्यवाचन, साहित्यचर्चा अशा मैफली होत.

शिरीष पै यांनी अनेक पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिल्या आहेत. ललित लेखसंग्रहांमध्ये आतला आवाज, आजचा दिवस, मैलोन् मैल, अनुभवांती, सय तर व्यक्तिचित्रणांमध्ये पपा, वडिलांचे सेवेसी हे विशेष लक्षात राहतात. त्यांनी तीन नाटके, दोन कादंबऱ्या, बाल वाङ्मय असे वैविध्यपूर्ण लेखन केले. त्यांनी सुमारे १० पुस्तकांचा अनुवाद केला आहे. त्यांनी गीतेच्या आठव्या अध्यायाचाही अनुवाद केला आहे. ’वडिलांना आठवून’ या व्यक्तिचित्रसंग्रहात शिरीष पै यांनी त्यांना लागलेला वाचनाचा नाद, कथा स्पर्धेतील पहिले बक्षीस, लेखनाची लागलेली सवय असा प्रवास उलगडला आहे.

## क्लिक...क्लिक...!




पनवेल : शहरातील वडाळे तलावात सूर्याचे पडलेले मनोहारी प्रतिबिंब. (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## आरोग्य प्रहर

# शेंगदाणेदेखील वाढवतात स्मरणशक्ती

बदाम खाल्ल्याने स्मरणशक्ती वाढते हे सर्वांनाच माहीत आहे, परंतु प्रत्येकजण हे बदाम खरेदी करू शकत नाही, तसेच काही लोकांना ते खायला आवडत नाही. त्याला सोपा आणि सगळ्यात स्वस्त असा पर्याय म्हणजे शेंगदाणे होय. शेंगदाणे स्मरणशक्तीदेखील सुधारतात, तसेच वयाशी संबंधित मानसिक आजारांवर मात करण्यास मदत होते. शेंगदाण्यामध्ये आढळणारे मोनो-अनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिडसारखे विशेष घटक खराब कोलेस्ट्रॉलला प्रतिबंध करतात. शेंगदाण्यामुळे हृदयविकाराचा धोकाही कमी होतो. ते केवळ भरपूर ऊर्जाच नाही तर प्रथिनांनीदेखील समृद्ध आहेत. चला तर मग पाहूया शेंगदाणे खाण्याचे कोणते फायदे आहेत आणि ते किती प्रमाणात खावे.



**निरोगी हृदय** : वेबएमडीनुसार, शेंगदाण्यामध्ये कार्डिओ-संरक्षणात्मक गुणधर्म असतात. अशा परिस्थितीत जे लोक नियमितपणे शेंगदाणे खातात. त्यांचा हृदयविकाराचा धोका कमी होतो, तसेच हे खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल सुधारते आणि रक्ताच्या लहान गुठळ्या होण्याच्या समस्येस प्रतिबंध करते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढत नाही.

**स्वस्थ मेंदू** : मेडिकल न्यूज टुडेनुसार, ओमेगा-३ फॅटी ॲसिड शेंगदाण्यामध्ये आढळतात. हे एक फॅटी ॲसिड आहे जे मेंदूचे कार्य वाढवते, ज्यामुळे स्मरणशक्ती सुधारते. अशा स्थितीत मुलांना दररोज सकाळी नाश्त्यामध्ये नियमितपणे भिजवलेले शेंगदाणे खायला द्यावे.

**त्वचेसाठी फायदेशीर** : मेडिकल न्यूज टुडेच्या मते, शेंगदाण्यामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडेंट असतात, जे त्वचेला वृद्धत्वापासून वाचवतात आणि त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात.

**पचन सुधारते** : यामध्ये भरपूर फायबर असते जे पचनक्रिया सुरळीत चालण्यास मदत करते. मेडिकल न्यूज टुडेच्या मते, याचे सेवन केल्याने तुमची पचनक्रिया व्यवस्थित काम करते आणि पोटाशी संबंधित अनेक समस्यांपासून सुटका मिळते.

दक्षिण ऑस्ट्रेलिया विद्यापीठाने ४,८२२ चिनी प्रौढांवर एक अभ्यास केला. त्यानंतरच्या विद्यापीठातील प्रमुख संशोधक मिंग ली म्हणाले, दररोज १० ग्रॅम किंवा दोन चमचे शेंगदाणे खाल्ल्याने वृद्ध लोकांमध्ये ६० टक्क्यांपर्यंत संज्ञानात्मक कार्य सुधारू शकते, परंतु त्यांचे सेवन मर्यादित प्रमाणात केले पाहिजे.

# रायगड जिल्हा ग्रंथोत्सवाचे शानदार उद्घाटन

**अलिबाग : जिमाका**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, मुंबई व रायगड जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील जिल्हा ग्रंथालयाच्या डोंगरे हॉलमध्ये १४ व १५ नोव्हेंबर रोजी रायगड जिल्हा ग्रंथोत्सव २०२२चे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा रायगड ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर म्हणाले की, ग्रंथोत्सवात विविध विषयांवरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या डिजिटल युग चालू आहे. मात्र या डिजिटल युगात तुम्ही जोपर्यंत पुस्तक हातात घेणार नाहीत आणि त्या पानांचा आवाज किंवा पानांचा सुवास पुस्तक वाचताना दरवळणार नाही तोपर्यंत माझ्या मते डिजिटल पुस्तकांची ओळख पुढच्या पिढीला होणार नाही. आजही दिवाळी आली की आपण दिवाळी अंक खरेदी करतो, ते आवडीने वाचतो. तरुण पिढीमध्ये या डिजिटल चळवळीमध्ये, इंटरनेटच्या युगामध्ये पुस्तकाचा सुवास नक्कीच दरवळला पाहिजे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्येही ग्रंथोत्सवाचे आयोजन केल्यास त्याचा निश्चितच फायदा होईल. जी पुस्तके जीर्ण झाली आहेत अशा पुस्तकांच्या डिजिटायझेशनसाठी देखील सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील.

गरुडझेप स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात येत आहे. पेण आणि अलिबाग तालुक्यात गरुडझेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरू असून लवकरच ते स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांकरिता खुले होईल. या अभ्यासिकेचा येथील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना निश्चितच होईल, असा विश्वास डॉ. कल्याणकर यांनी व्यक्त केला.

ज्येष्ठ साहित्यिका श्रीमती इंदुमती जोंधळे म्हणाल्या की, पुस्तके आपल्याला घडवत असतात, विचार देत असतात. पुस्तके माणूस म्हणून आपल्याला विचाराने श्रीमंत करत असतात. त्यामुळे ज्या घरात पुस्तकाचे कपाट ते घर वैचारीकदृष्ट्या श्रीमंत आहे. माणूस म्हणून दुसऱ्याच्या मनाचा विचार आपल्याला करता आला पाहिजे.

अलिबागचे माजी नगराध्यक्ष अलिबाग प्रशांत नाईक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ज्योत्स्ना शिंदे, सुधीर शेठ, संजय बोंदार्डे, सुचिता पाटील, अजित पवार आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

## कशेडी घाटात दोन एसटी बसची धडक

### चालक किरकोळ जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील धामणदिवी गावाच्या हद्दीत रविवारी (दि. १३) पहाटे दोन एसटी गाड्यांची समोरासमोर धडक झाली. या दोन्ही बसमधून एकूण ५२ प्रवासी प्रवास करीत होते. मात्र अपघातात केवळ चालक किरकोळ जखमी झाला.

एसटी चालक समशेर नवाब तडवी हे आपल्या ताब्यातील मुंबई-रत्नागिरी बस (एमएच-२०,बीएल-३६९८) घेऊन जात होते. त्याचवेळी एसटी चालक प्रतीक पुरुषोत्तम कदम हे त्यांच्या ताब्यातील देवाचे गोठणे ते बोरिवली बस (एमएच १४ बीटी २५५७) घेऊन येत होते. पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटात धामणदेवी गावाच्या हद्दीत एका ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या नादात मुंबई-रत्नागिरी बसने विरुध्द दिशेला जाऊन समोरून येणाऱ्या देवाचे गोठणे ते बोरिवली बसला धडक दिली. या अपघातात चालक तडवी हे किरकोळ जखमी झाले आहेत. या दोन्ही एसटी बसमधून प्रत्येकी २६प्रवासी प्रवास करीत होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास हवालदार जे. एस. लोखंडे करीत आहेत.

## माथेरान दस्तुरी नाका पार्किंगमधून दुचाकीची चोरी

### पोलिसांकडून चार जणांना अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानधील अश्वपालकाने दस्तुरी नाका पार्किंगमध्ये उभी केलेली दुचाकी चोरी झाली असून, या बाबत तक्रार दाखल करण्यात आल्यानंतर माथेरान पोलिसांनी सीसीटिव्ही फूटेज पाहून चार तरुणांना अटक केली आहे.

अश्वपालक रामचंद्र नामदेव ठमके (वय ३५) हे धोत्रे गावातून माथेरानमध्ये व्यवसाय करण्यासाठी येत असतात. नेहमीप्रमाणे ठमके यांनी शुक्रवारी (दि. ११) सकाळी दहा वाजता आपली होंडा शाईन कंपनीची दुचाकी (एमएच-४६,आर-०२४८)दस्तुरी नाका पार्किंगमध्ये उभी केली आणि व्यवसाय करण्यासाठी ते माथेरानमध्ये गेले होते. त्याच दिवशी सायंकाळी साडे सात वाजता अश्वचालक रामचंद्र ठमके हे आपली कामे उरकून घरी जाण्यासाठी दस्तुरी नाका पार्किंग येथे दुचाकी घेण्यासाठी आले असता, तेथे त्यांना त्यांची दुचाकी आढळून आली नाही. त्यामुळें अश्वपालक रामचंद्र ठमके यांनी पोलीस ठाणे गाठले आणि रीतसर तक्रार केली.

माथेरानचे सहाय्यक फौजदार एस. एम. पाटील आणि पोलीस शिपाई दामोदर खतेले यांनी दस्तुरी नाका येथील पार्किंगमध्ये लावलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले दुचाकी चोरुन नेताना काही तरुण दिसले. त्यावरून पोलिसांनी चार तरुणांना संशयित म्हणून ताब्यात घेतले. अधिक चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

या प्रकरणी माथेरान पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## कर्जत रेल्वेस्थानकासमोरील रस्त्याचे डांबरीकरण होणार

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या कर्जत स्थानकाच्या प्रवेशद्वारा बाहेरच रस्त्याला खड्डे पडले होते. संपूर्ण पावसाळ्यात प्रवाशांना जाता-येता या खड्ड्यांतील खराब पाण्याचा सामना करावा लागत होता. या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.

कर्जत रेल्वे स्थानकावरून रोजच हजारोच्या संख्येने प्रवासी ये-जा करीत असतात. या स्थानकातून प्रत्येक तासाला मुंबईकडे जाण्यासाठी लोकल गाड्या उपलब्ध आहे. तसेच लांब पल्ल्याच्या गाड्यासुद्धा येत असतात. फक्त शहरच नव्हे तर संपुर्ण कर्जत तालुका अवलंबून असल्याने या रेल्वे स्थानकावर नेहमीच प्रवाशांची वर्दळ असते. कर्जत रेल्वेस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेरील रस्त्यावर खड्डे पडले आहेत. प्रवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात तर या खड्ड्यांमध्ये पाण्याचे डबकी तयार झाली होती. महिलांना व लहान मुलांना त्यांचा त्रास सहन करावा लागत होता. दुचाकी वाहन धारकांनासुद्धा या खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी गेल्या वर्षी रेल्वे प्रशासनास निदर्शनास आणून देऊन पाठपुरावा सुरू केला होता.

दरम्यान, कर्जत स्थानकाबाहेरील काही खड्ड्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे, उर्वरित खड्ड्यांचे लवकरच काँक्रिटीकरण करून त्यानंतर या रस्त्याचे डांबरीकरण केले जाईल, असे मध्य रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

## राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एकूण ३५ हजार २६५ प्रकरणे निकाली

### १८ कोटी ९० लाख ८४ हजार ८३८ रुपयांची तडजोड रक्कम वसूल

**अलिबाग : जिमाका**

न्यायालयात वर्षानुवर्षे वाद करीत बसून वेळ, पैसा आणि ताकद खर्च करण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी सामजस्याची भूमिका घेउन लोक न्यायालयात समेट घडवावा, असा प्रवाह भारतीय न्यायालयांच्या इतिहासात गेल्या दशकात प्रकर्षाने रूढ झालेला आहे. १२ नोवेंबर २०२२ रोजी रायगड जिल्ह्यात झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण ३५ हजार २६५ प्रकरणे सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयांत दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एस. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण एक लाख पाच हजार १८६ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी दाखलपूर्व ३३ हजार ७७१ व प्रलंबित प्रकरणांपैकी एक हजार ४९४ प्रकरणे अशी एकूण ३५ हजार २६५ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली व त्याव्दारे पक्षकारांना एकूण १८ कोटी ९० लाख ८४ हजार ८३८ रूपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली.

### १८ जोडप्यांचा संसार जुळला

*रायगड जिल्ह्यातील लोकन्यायालयात १८ जोडप्यांचा (अलिबाग येथील लोकन्यायालयात तीन उरण दोन, पेण दोन, महाड पाच, मुरूड एक, खालापूर दोन, रोहा तीन) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे नादांयला गेली. अलिबाग येथील पक्षाकरांचा प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. एस. सावंत, व पॅनलवरील न्यायधिशांनी फुल देवून सत्कार केला व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.*

*रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत ३२ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली.*

*या लोक न्यायालयांना यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग तसेच रायगड जिल्हा परिषद, पोलीस अधिक्षक व सर्व पोलीस कर्मचारी आणि सर्व पक्षकारांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एस. सावंत व न्यायाधीश तथा सचिव अमोल अ. शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.*

## कर्जतमधील आरोग्य शिबिरात १८० जणांची तपासणी

**कर्जत : प्रतिनिधी**

गजवक्र रियालिटी कंपनीचे संचालक गणेश मुंढे यांनी आयुर हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजित केलेल्या मोफत आरोग्य चिकित्सा शिबिरात १८० रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

कर्जतमधील विठ्ठलनगर भागातील गजवक्र कंपनीच्या सभागृहात मोफत आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीचे संचालक गणेश मुंढे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी आदित्य सारडा, डॉ. वर्षा बोंबे, प्रितेश बोंबे, ओंकार दळवी आदी उपस्थित होते. या शिबिरात मधुमेह चाचणी, नेत्र तपासणी करण्यात आली. एकूण १८० जणांची तपासणी करण्यात आली.

आयुर हॉस्पिटलच्या डॉ. वर्षा बोंबे, सायली शिरकार, पूनम पाटील, सागर धनशेट्टी, सागर शेजवळ आदींनी रुग्णांची तपासणी केली. राजाभाऊ कोठारी, सतीश श्रीखंडे, प्रकाश शहा, श्रीनिवास राव, काशीनाथ बैलमारे आदी या वेळी उपस्थित होते.




**ग्रामपंचायत ओवळे**

**कार्यालय :- ओवळे, पो. पारगाव, ता. पनवेल, जि.रायगड पिन. ४१०२०६**

स्थापना:- ०१/०४/१९५२ mail- grampanchayatowale3@gmail.com

जा.क्र. दि.०४/११/२०२२

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत ओवळे, ता. पनवेल यांनी खालीलप्रमाणे सन २०२२-२३ साठी ग्रामसभा दि. ०२/१०/२०२२ नुसार प्रशासकीय मान्यता दिलेले साहित्य खरेदी करणे अथवा भाडेतत्वावर घेणे साठी जाहीर निविदा सीलबंद लिफाफ्यामध्ये दि. १५/११/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय ओवळे यांचे कडे मागविण्यात येत आहेत.

सदर निविदा दि. १७/११/२०२२ रोजी दुपारी ठीक १२.०० वाजता किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्यादिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अथवा नाकारणे चे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा स्विकारणे अंतिम तारीख | पुरवठा कालावधी | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ब्लास्टिंग ची तीव्रता मोजण्याचे मशीन खरेदी करणे. | दरपत्रक प्राप्त झालेनंतर सभा ठरवेल त्याप्रमाणे | १५/११/२२ | ५ दिवस | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी /सी.एस.आर. |
| २ | ब्लास्टिंग ची तीव्रता मोजण्याचे मशीन भाडेतत्वावर घेणे. | दरपत्रक प्राप्त झालेनंतर सभा ठरवेल त्याप्रमाणे | १५/११/२२ | ५ दिवस | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी /सी.एस.आर. |
| ३ | वायू प्रदूषण मोजण्याचे मशीन खरेदी करणे. | दरपत्रक प्राप्त झालेनंतर सभा ठरवेल त्याप्रमाणे | १५/११/२२ | ५ दिवस | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी /सी.एस.आर. |
| ४ | द्रोण द्वारे ब्लास्टिंग व वायू प्रदुषणाचे फोटो व व्हिडीओ तयार करणे. | दरपत्रक प्राप्त झालेनंतर सभा ठरवेल त्याप्रमाणे | १५/११/२२ | ५ दिवस | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी /सी.एस.आर. |

वरील प्रमाणे निविदा ग्रामपंचायत अटी व शर्ती कार्यालयात पाहून मान्य असल्यास बंद लिफाफ्यामध्ये निविदा विहित मुदतीत सादर कराव्यात.

**सही/-**
**सचिन बाळाराम पाटील**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत ओवळे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**रेश्मा अमित मुंगाजी**
**सरपंच**
**ग्रामपंचायत ओवळे**
**ता. पनवेल, जि. रायगड**


## कुडगाव प्राथमिक शाळेत वाचन कोपरा



### बाल पेंटींगचेही उद्घाटन

**मुरूड : प्रतिनिधी**

अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेडच्या वतीने मुरूड तालुक्यातील कुडगाव प्राथमिक शाळेत वाचन कोपरा सुरू करण्यात आला आहे. बालदिनाचे औचित्यसाधून सोमवारी (दि. १४) वाचन कोपऱ्याचे उद्घाटन अदानी फाउंडेशनचे चंद्रशेखर गौडा, ऋषिन पटेल, जयश्री काळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दीपक पाबरेकर, कुडगाव ग्रामपंचायत सदस्य जगन्नाथ खरगांवकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच शिक्षणात झालेल्या नवनवीन बदलाबद्दल माहिती मिळावी यासाठी अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेडच्या वतीने कुडगाव प्राथमिक शाळेत वाचन कोपरा सुरू करण्यात आला आहे. त्यासाठी फाउंडेशनतर्फे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषिक पुस्तके पुरविण्यात आली आहेत. तसेच फाउंडेशनच्या वतीने शाळेतील एका वर्गखोलीत सूर्यमालिकेतील ग्रह, पाढे, थोरांची ओळख अशी विविध प्रकारची रंगरंगोटी करण्यात आली आहे. बालदिनाचे औचित्यसाधून या दोन्ही उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.

माता सरस्वती आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पमाला करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक सुदर्शन बिडवे यांनी केले. अदानी फाउंडेशन चंद्रशेखर गौडा, ग्रामपंचायत सदस्य जगन्नाथ खरगांवकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिपक पाबरेकर, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर मार्कडे यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. या वेळी विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व या वेळी उपस्थित होते. अवधूत पाटील यांनी आभार मानले.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, मौजे पागोटे, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादीत केलेल्या आहेत.

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजे पागोटे, ता. उरण, जि. रायगड.**

| यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. |
|---|---|---|---|
| ९९/१९८३ | ६६ | ६ | ०-१०-१२ |
| २२४/१९८६ | ६३ | ४ | ०-१३-०० |
| | ३३ | २अ | ०-०४-०० |
| | ९० | ६ | ०-१३-०० |
| | ९६ | ३अ | ०-३०-४० |
| २२५/१९८५ | २६ | २ | ०-०८-४० |
| | ९९ | ६ | ०-१७-३० |
| | ११८ | १ | ०-०८-१० |
| | ४० | ५ | ०-१७-८ |

वर नमुद संपादीत मिळकतीपोटी सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे **श्री. प्रमोद प्रभाकर कडू, श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण कडू, श्री. दिनकर लक्ष्मण कडू, श्री. नरेश लक्ष्मण कडू, श्री. यशवंत लक्ष्मण कडू यांना मौजे द्रोणागिरी, ता. उरण, जि रायगड येथे अंदाजे १००० चौ.मी.** क्षेत्राचा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे. आमचे अशिल सदर भूखंड **श्री. प्रमोद प्रभाकर कडू, वगैरे** यांच्याकडून मोबदल्यापोटी त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इराद्यात आहेत.

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
दिनांक : १४/११/२०२२

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ,**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र.: २७४५६३०६



**पनवेल महानगरपालिका**

**ता. पनवेल, जि. रायगड. पिन नं. ४१० २०६**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| | मे.रचना कंस्ट्रक्शन, आदर्श को.ऑप.सोसायटी, प्लॉट क्र.१९, बावन बंगला, पनवेल | ०३ नारळाची झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट क्र. १९ बावन बंगला, पनवेल येथे ०३ नारळाची झाडे नवीन इमारत बांधकाम करणेस अडथळा निर्माण करीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र.९२/६५५/२०२२
दिनांक : १४/११/२०२२

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# वैद्यकीय महाविद्यालय भूखंड खरेदीत चालढकल -आमदार मंदा म्हात्रे

## व्यवहार पूर्ण करा; अन्यथा आंदोलनाचा नवी मुंबई महापालिकेला इशारा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासाठी सिडकोकडून भूखंड प्राप्त झाला आहे. सहज शक्य असूनही त्याची रक्कम अदा करून भूखंड घेतला जात नसल्याने अखेर आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई महापालिकेला आंदोलनाचा इशारा दिला आहे. येत्या १५ दिवसांत मनपाने रक्कम सिडकोला देत भूखंड व्यवहार पूर्ण करावा अन्यथा २५ तारखेला आंदोलन करण्यात येईल, असे पत्र थेट पालिका आयुक्तांना दिले आहे.



नवी मुंबई हे पुण्यानंतर शिक्षण पंढरी बनण्याकडे वाटचाल करीत असताना सरकारी वैद्यकीय महाविद्यालाची नितांत गरज होती. कोरोना काळात याची जाणीव सर्वच पातळीवर झाली. त्यामुळे यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आणि मनपा मुख्यालय नजीक ३४ हजार ८०० चौरस मीटरचा भूखंड या साठी अग्रेषित करण्यात आला. त्यासाठी १०७ कोटी १३ लाख ५२ हजार ८०० रुपये मनपा सिडकोला देणे अपेक्षित होते. दरम्यान, ही रक्कम कमी करावी म्हणून प्रयत्न केल्यावर सुमारे ६० कोटी रुपये कमी करण्यात आले असा दावा त्यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी केला.

### डॉक्टर, नर्सची नव्याने भरती करा

*विद्यमान स्थितीत नवी मुंबईत तीन रुग्णालय इमारती आहेत. मात्र त्यात काम करणारे डॉक्टरांना वेतन कमी असल्याने काम करण्यास फारसे उत्सुक नसतात. तसेच सदर रुग्णालयात सुविधांचा अभाव असल्याच्या अनेक तक्रारी होत समोर येत आहेत. रुग्णालयात एमम.आर. आय. सुविधा उपलब्ध नसून नेरूळ आणि ऐरोली रुग्णालयात अतिदक्षता विभाग नाही डॉक्टर्स आणि नर्सची कमतरता तसेच औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यास आरोग्य विभाग कमी पडत आहे. याकरिता डॉक्टर आणि नर्सची नव्याने भरती करण्याची गरज म्हात्रे यांनी आयुक्तांना दिलेल्या अन्य एका पत्रात व्यक्त केली आहे.*

भूखंड खरेदीत चालढकल केली जात असून स्थानिक राजकारणात मैलाचा दगड ठरणारा प्रकल्प अडकला जाऊ नये यासाठी नियमाप्रमाणे पालिकेने सहकार्य करावे, असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी केले आहे. या भूखंड पोटी असलेली रक्कम १५ दिवसांत पालिकेने सिडकोला द्यावी अन्यथा २५ तारखेला उग्र आंदोलन करण्यात येईल असे पत्रच आयुक्त राजेश नार्वेकर यांना दिले आहे, अशी माहिती आमदार मंदा म्हात्रे यांनी दिली.

# बाल दिनानिमित्त नवी मुंबईत विविध उपक्रमांना प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**



सदैव मुलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करणारे टाइनि एन शायनि (किड्स हेअरकट सलून) शेटच्येज् कॉन्सिअस पॅरेंटिंग आणि दुर्गेश्वरी महिला मंडळ ह्या तीन संस्था एकत्र आल्या. बेलापूरच्या सेक्टर ८मधील आंगणवाडीतील लहान मुलांना त्याच्या बालपणीच्या रमणीय, आनंददायी दिवसामधील बालदिन हा संस्मरणीय व्हावा आणि सकारात्मक व्यक्तिमत्त्वाकडे त्यांची वाटचाल अधिक दृढतेने व्हावी ह्यासाठी विविध खेळ, गोष्टी, गाणी याचबरोबर स्वसंरक्षणाचे धडे असे आयोजन करण्यात आले होते.

टाइनि एन शाइनिच्या संचालिका दीप्ती कीर्तिकर यांच्या मते मुलांच्या आत्मविकासाबरोबर त्यांना समाजातही निडरतेने वावरण्यासाठी सामाजिक सभ्यता शिकवणे गरजरेचे असते. केस कर्तन केल्यामुळे मुलांना नीटनेटकेपणाची आवड निर्माण होऊन त्यांची स्वप्रतिमा अधिक उजळून समाजात ते आत्मनिर्भरतेने वावरू शकतील.

मुलांचया शारीरिक वाढीबरोबर मनाचीही जडणघडण होत असते. सातत्याने आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींचा मुलांच्या मनावर उमटणाऱ्या प्रतिमांचे कायम स्वरूपी धारणेत रूपांतरण होते. ही धारणा पक्की झाली की तिचे स्वभाव आणि वर्तनातून पडसाद उमटू लागतात. जागतिक आरोग्य संघटनेने २१ वे शतक हे मानसिक अस्वास्थ्याचे शतक म्हणून जाहीर केले आहे. विविध जागतिक आकडेवाडीनुसार मुलामुलींमध्ये सामाजिक स्वास्थ्य बिघडतील अशी हिंसकवृत्ती, तापटपणा, नैराश्य वाढताना दिसत आहे. ह्या साऱ्यांचे मूळ समाजातील गरीब श्रीमंत दरी बरोबरच चढाओढ, अति महत्त्वकांक्षा, ईर्षा, अधिकतेची हाव, असंतुष्टपणा ह्यामध्येच आहे.

उज्वला शेटचे, शेटच्येज् कॉन्सिअस पॅरेंटिंगच्या संस्थापिका म्हणतात, भारतीय संस्कृतीचे मर्मस्थान हे सुदृढ आनंदी मन आहे. आनंदी आणि प्रेमळ वातावरणात वाढलेली मुलं निकोप समाज निर्मितीसाठी सहाय्यक ठरतात ह्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे.सामाजिक बांधिलकीचे भान सर्वांमध्ये जागृत झाल्यास समाजात समानता राखण्यास मदत होईल.

दुर्गेश्वरी महिला मंडळाची संस्थापिका वर्षा नाथ यांनी सांगितले, आम्ही समाजातील दुर्बल घटकातील मुलांचे पालकत्व स्वीकारून आपल्या देशाची भावी पिढी ही अधिक सजग, भावनिकदृष्ट्या सक्षम, वैचारिक दृष्ट्या कशी समृद्ध होईल यासाठी आमचा नेहमी प्रयत्न राहील.

दुर्बल मनाला सबलीकरणासाठी स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक दाखवताना शीतल निकम म्हणाल्या की, उत्तम संस्काराचे बीज रोपण आणि आनंददायी संस्मरणीय बालपण हे आजच्या दिवसाचे प्रयोजन आजचा बाल दिन उपक्रम हा त्यातीलच एक महत्त्वपूर्ण भाग होता. मुले खाऊ आणि बक्षीस घेऊन 'पुन्हा याल ना?' हे प्रेमळ निमंत्रण आम्हाला देऊन आनंदाने घरी गेली.

# चिरनेरच्या शेतकऱ्यांना कडधान्याचे वाटप

**उरण : वार्ताहर**



उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या उरण तालुका कृषीविभागामार्फत, रब्बी हंगामातील पेरणीसाठी प्रत्येकी तीन किलो मूग आणि चार किलो हरभरा या कडधान्याचे वाटप करण्यात आले. चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवारी (दि. ११) हा कडधान्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला होता.

या वेळी येथील कडधान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना कडधान्याचे वाटप करण्यात आले. दरम्यान, कडधान्य पेरून ते उगवल्यानंतर त्याची पाहणी कृषी विभागामार्फत करण्यात येणार आहे. या वेळी उरणचे कृषी मंडळ अधिकारी श्री. लोहकरे, आंबा बागायतदार बळीराम म्हात्रे, चिरनेरचे पोलीस पाटील संजय पाटील, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील व पशुपालक शेतकरी राजेंद्र रेवसकर आदींच्या उपस्थितीत येथील शेतकऱ्यांना कडधान्याचे वाटप करण्यात आले.

# आपटा गावातून वारकरी दिंडीचे प्रस्थान

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा गावातील वारकरी संप्रदायाचे ग्रामस्थ दिंड्या पताका ध्वज घेऊन रामकृष्ण हरी, असे जयघोषात आळंदीला पायी निघाले आहेत. यामध्ये आपटा गावातील वारकरी तुराडे गुळसुंदे व पुढे मोहोपाडा येथील वारकरी संप्रदायाचे इतर अनुयायी व अनेक ग्रामस्थ व मदतीसाठी आजूबाजूचया गावातील लोक आहेत.



भक्तीमय वातावरणात हा प्रवास सुरू झाला आहे. आपटा गावातील सर्जेराव माने, सुरेश सावंत, पाटील परिवार, शामबुंवा आबवणे, पांडुरंग सकपाळ व इतर अनेक गावातील वारकरी या बरोबर जात आहेत.

# इनऑर्बिट मॉलमध्ये बाल दिन उत्सव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आज १४ नोव्हेंबर जागतिक बाल दिनानिमित्ताने सर्वत्र मुलांना बाल दिनाच्या शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. नोव्हेंबर हा एक विशेष महिना साजरा करण्यात येतो. याच बालदिनानिमित्ताने वाशीतील इनऑर्बिट मॉल ११ ते १७ नोव्हेंबरदरम्यान फन फॅक्टरी येथे बाल दिनाचा आठवडाभराचा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

बाल दिनाच्या दिवशी मुलांचा आनंद आणि निरागसपणा साजरा करतो. या वर्षी, वाशीच्या इनऑर्बिट मॉलमध्ये ११ नोव्हेंबर रोजी लेखिका रुपांगी शर्मा, राजेश श्रीवास्तव आणि नील डिसिल्वा यांच्यात क्रॉसवर्ड बुकस्टोअरद्वारे आयोजित पुस्तकांसह मुलांना वाचनाच्या चांगल्या सवयी लावण्यासाठी आणि मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी पेज-टर्नर्स इव्हेंटच्या संवादात्मक सत्राने सुरुवात झाली. यामध्ये ४०० हून अधिक मुले सहभागी झाले होते. १२ नोव्हेंबरपासून ते १७ नोव्हेंबर पर्यंत मॉलमध्ये डिस्कव्हरी स्टोअर इव्हेंट साजरा करण्यात येत आहे.

यामध्ये २ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी मनोरंजक क्रियाकलापांचा आठवडा ज्यामध्ये बाउंसिंग मशीनवर खेळणे, डार्ट माइंड्स, स्प्रिंट मशीन, स्टोअर टॅटू, स्वतःचे केप तयार करणे, मेणबत्ती तयार करणे आणि युनिकॉर्न हेअरबँड सजावट आणि बरेच खेळ समाविष्ट आहेत.



# ग्रामीण भागात शेतीसाठी आजही बैलगाडीचे योगदान

**मोहोपाडा : वार्ताहर**

ग्रामीण भागात भात शेतीची सर्वच कामे ही बैलगाडीच्या साहाय्याने केली जात असल्याचे आजही दिसून येते. बदलत्या काळात जरी वाहतुकीची साधने वाढली असली तरी सुद्धा शेतीच्या कामासाठी बैलगाडी अग्रेसर ठरत आहे.

यामध्ये शेतातील भारे वाहणे, भात भरडणे, शेतामध्ये शेणखत टाकणे त्याच बरोबर वाहतूकीच्या कामासाठी वापर होत आहे. यामुळे शेतकरी वर्गांच्या प्रत्येक क्षणाला बैलगाडी मोठे योगदान ठरत आहे. शिवाय इंधनाची बचत होत असते. निसर्गाच्या कुशित निर्माण होणारे गवत हेच त्यांचे आहार असल्यामुळे शेतकरी वर्ग बैलगाडीचा वापर करीत आहे, मात्र गेल्या काही वर्षात वाहनांचा वापर वाढल्यामुळे बैलगाडी काळभाय्य होत असल्याचे दिसून येते.



गेल्या काही वर्षामध्ये भात शेतीचे विभाजन झाले असून त्याच बरोबर बहुतेक भात लागवडीवर औद्योगिक कारखाने निर्माण झाले असून भात लागवड क्षेत्र कमी होत चालले आहे. त्याचबरोबर दर वर्षी नैसर्गिक प्रकोप यामुळे भात शेतीमध्ये टाकलेला पैसा वसूल होत नसल्यामुळे शेतकरी वर्गांनी शेतीकडे पाठ फिरवली आहे. शिवाय आजची तरुण पिढी शेतीच्या कामाकडे दुर्लक्ष करीत आहे. यामुळे तालुक्यातील बहुतेक भात लागवडची जमीन ओस पडल्याचे दृष्य तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे.

त्याच बरोबर गुरे सांभाळणे म्हणजे प्रथम त्यांच्या चारा, पाणी सोय करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर पावसाळ्यात निर्माण होणारे गवत सुकले कि गुरांचे खाद्य म्हणून वापरले जाते मात्र त्याला सुद्धा वणवे लावून दिले जात असल्यामुळे गुरांच्या खाद्याचा प्रश्न ऐरणीवर येत असतो या सर्व बाबीमुळे बैलगाडी जवळ-जवळ हद्दपार होत चालली असली तरी सुद्धा ग्रामीण भागत शेतीच्या कामासाठी बैलगाडी अग्रेसर ठरत आहे.

# मोहोपाडा शाळेतील वर्गमित्रांचा २४ वर्षांनंतर रंगला स्नेहमेळावा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये सन १९९८ साली इयत्ता दहावीत शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात जनता विद्यालय शाळेच्या सभामंडपात झाला. दहावीच्या वर्गांतील हे विद्यार्थी २४ वर्षांनंतर एकमेकांना भेटले. या कार्यक्रमास १९९८ साली अध्यापन करणारे चार शिक्षकही स्नेहमेळाव्यास उपस्थित होते.

या वेळी शिक्षकांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर माजी शिक्षक व कोरोनाकाळात मृत्यू पावलेल्या आप्त व नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या वेळी माजी विद्यार्थ्यांनी १९९८ मध्ये अध्यापन करणारे बाळासाहेब सावर्डे, डी. सी. तायडे, डी. के. कांबळे व शशिकांत जाधव या शिक्षकांचा भेटवस्तू देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांनी शाळा व मित्रांसंबंधी आठवणी जागवल्या. या कार्यक्रमासाठी मेहनत व विखुरलेल्या मित्रांना संपर्क साधून एकत्र आणण्यासाठी निलेश बाबरे यांनी पुढाकार घेऊन सर्व वर्गमित्रांना एकत्र आणले.

या स्नेहमेळाव्यात २४ वर्षांनंतर एकत्र आलेल्या वर्गमित्रांनी सन १९९८ नंतर आपापला जीवनप्रवास सांगितला. यात कोणी डॉक्टर, इंजिनिअर, कंत्राटदार, मटेरियल सप्लायर्स, मार्केटींग मॅनेजर, कपडा व्यवसायीक, कंपनी कामगार आदी झाल्याचे परिचय देताना सांगितले. संतोष पाटील, नरेश जांभळे, निलेश पारंगे, उमेश जांभळे, जयराम कोकंबे, मंगेश डवळे, महेन्द्र जाधव, जगदिश कदम, अमित शहा यांनी सहकार्य केले.

ज्योती, अश्विनी, अंजना, सुष्मा, रोहिणी, निता यांच्यासह सन १९९८ वर्गमित्र उपस्थित होते.



# उरणमध्ये नाका कामगारांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरणमध्ये समाज प्रबोधन शिक्षण संस्थेच्या शाळेत आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या वतीने असंघटित क्षेत्रातील (नाका) कामगारांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये माजी निवृत्त कामगार आयुक्त अधिकार शाम जोशी, हिंद मजदुर सभा सलग्न जनरल मजदुर सभा व टेक्सटाइल कामगार सभा ठाणे जनरल सेक्रेटरी प्रशांत श्येट्ये, जगदीश उपाध्याय, कोकण श्रमिक संघ पनवेल खजिनदार एकनाथ ठोंबरे, कार्यशाळा आयोजक सुनील विश्वनाथ जोशी, शाम जोशी यांनी कामगार कायदे व ई-श्रम कार्ड इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळ बोर्ड घरेलु कामगार मंडळ बोर्ड यांची उपस्थितांना माहिती दिली व त्यामध्ये नोंदणी करण्याबाबत आवाहन केले.

या वेळी जगदीश उपाध्याय, प्रशांत शेट्ये, एकनाथ ठोंबरे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी चार फाटा, नाईक नगर, ठाकूर नगर, एंजल गेट ओएनजीसी येथील नाका कामगार व झोपडट्टीवासीय महिला व पुरूष युवा कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. राम झिने, कैलास राठोड, प्रकाश शरणागत, खडसे ताई, रंजनाताई यांनी आपल्या समस्या या वेळी मांडल्या.

# दक्षता जागरूकता आठवडा उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

धकाधकीचया व वाढत्या मागणी जीवनशैलीत इमानेइतबारेची जीवनशैली असावी, असे प्रत्येक माणसाचे ध्येय असते व हाच संदेश घेऊन बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई झोनने नुकताच दक्षता जागरूकता आठवडा मोठ्या उत्साहात झाला.



बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे रॅली

बँकेने सी.बी.डी. बेलापूर शाखा व आपल्या वाशी स्थित सेक्टर १ मधून रॅलीचे आयोजन केले. या रॅलीचा मुख्य उद्देश्य लोकांपर्यंत भ्रष्टाचार मुक्त भारत, विकसित भारत हा संदेश देणे हा होता असे बँकेच्या महाप्रबंधक व झोनल मॅनेजर अपर्णा जोगळेकर यांनी सांगितले. रॅलीदरम्यान एका पथनाट्याचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. पथनाट्यात बँकेतील कर्मचारी निलेश सोनावणे, प्रथमेश मलाईकर, प्रसेनजीत अंकुश, पूनम भराटे, गीता सावंत, प्रियांका वाळके, ममता काशीद, अनुराधा साळुंखे, सुशांत वर्मा, स्वाती होटलप्पा, केतकी जोशी आदींनी सहभाग घेतला होता.

पथनाट्यामधून भ्रष्टाचाराला कसा आळा घालू शकतो असा मौलिक संदेश देऊन सर्व नागरिकांचे लक्ष्य वेधण्यात आले. त्याचप्रमाणे बँकेच्या कर्मचाऱ्यांची भव्य प्रभातफेरी सेक्टर १ वाशी स्थित झोनल ऑफिस येथून निघून मिनी समुद्रकिनारे वाशी ह्यामार्गाने झोनल ऑफिस सेक्टर १ मध्ये रॅलीचे समापन झाले. रॅलीमध्ये भ्रष्टाचार निर्मूलनाचा संदेश देणारे फलके दर्शविण्यात आली व सर्वांचे लक्ष्य वेधणाऱ्या घोषणा सुद्धा देण्यात आल्या. काही नागरिकांनी रॅलीचे कौतुक करून बँकेच्या अभिनव उपक्रमाची प्रशंसा केली. सर्वांचे लक्ष्य वेधणाऱ्या घोषणा अरविंद मोरे व प्रसेनजीतअंकुश यांनी दिल्या.

बँकेच्या दोन्ही रॅलीमध्ये बँकेच्या महाप्रबंधक व झोनल मॅनेजर, अपर्णाजोगळेकर व उपझोनल मॅनेजर सौरभ सिंग यांनी सक्रिय सहभाग घेऊन रॅलीचे नेतृत्व केले. रॅलीत बँकेचे शाखा प्रबंधक, अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. ह्यात सहायक महाप्रबंधक पिंकी राणी, दिलीपकुमार उपाध्याय, मुख्यप्रबंधक विश्वनाथ साहू, मनीषा शर्मा आदींनी सहभाग घेतला. रॅलीच्या यशस्वितेकरिता मुख्यप्रबंधक विश्वनाथ साहू, प्रसेनजीत अंकुश, प्रशांत मोरे व संतोष वंजारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी आव्हाने ओळखून स्वयंपूर्ण बनावे

## सीईओ डॉ. किरण पाटील यांचे आवाहन; बाल दिनानिमित्त अलिबागमध्ये कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशासमोरील आव्हाने ओळखून प्रत्येक विद्यार्थ्याने स्वयंपूर्ण बनावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सोमवारी (दि. १४) अलिबाग तालुक्यातील मानीभुते येथे केले.



बाल दिनानिमित्त डॉ. किरण पाटील यांनी सोमवारी रायगड जिल्हा परिषदेच्या मानीभुते येथील शाळेला भेट देत विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. त्या वेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. विद्यार्थ्यांनी करिअरच्या दृष्टीने स्वप्न पाहून, त्यादृष्टीने आत्तापासूनच प्रयत्न करावेत, असा सल्ला त्यांनी या वेळी बोलताना दिला.

डॉ. किरण पाटील पुढे म्हणाले की, परीक्षेत चांगले मार्क मिळविण्यासाठी जे वाचतो, बोलतो त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे, तरच आपल्याला पाठ पूर्णपणे समजेल. तसेच डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना भारतीय प्रतिज्ञा अर्थ समजावून सांगितला, निरोगी सदृढ आरोग्याचे महत्त्व सांगितले. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, पाणी वापर काटकसरीने करावा याबाबत मार्गदर्शन केले. या वेळी निपुण भारत अंतर्गत शाळांमध्ये करण्यात येणाऱ्या माता पालक गटांचे उद्दिष्ट व स्वरूप समजावून सांगितले.

जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, अलिबागचे गटविकास अधिकारी मंगेश पाटील, गटशिक्षणाधिकारी मंगेश पिंगळा, मानीभुते शाळा मुख्याध्यापक सुनील पाटील, सरपंच अस्मिता म्हात्रे, उपसरपंच राकेश म्हात्रे, संदीप वारगे, रवींद्र वर्तक, नेहा मगर यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक या वेळी उपस्थित होते.

# द्रुतगती मार्गावर कारचा अपघात

## महिला ठार, चालक गंभीर जखमी

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटातील खोपोली बायपासजवळ पुण्याकडून मुंबईकडे जात असलेल्या भरधाव वेगातील कारने रस्ता दुभाजकाला धडक दिली. या अपघातात कारमधील महिला ठार झाली असून कार चालक गंभीर जखमी झाला आहे.

कार चालक शेखर शिंदे (वय ३२, रा. भिवंडी) हा त्याच्या ताब्यातील कार चालवीत शनिवारी दुपारी पुण्याकडून मुंबईकडे जात होता. द्रुतगती मार्गावरील खोपोली बायपासजवळ कार अनियंत्रित होऊन रस्तादुभाजकावर धडकली. या अपघातात कारमधील सुप्रिया किसन माने (वय ३०, रा. कल्याण) या महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर कार चालक शेखर शिंदे हा गंभीर जखमी झाल्याने त्याला कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. या वेळी महामार्गावरील वाहतूक सुमारे २० मिनिटे खोळंबली होती.

दरम्यान, या अपघाताची माहिती होताच द्रुतगती मार्गावरील आपत्कालीन यंत्रणा, वाहतूक पोलीस, खोपोली पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. अपघातग्रस्त कार बाजूला केल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

# ओबीसी आरक्षणासाठी एकत्र येण्याची हाक



**माणगाव : प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण, जातीनिहाय जनगणना व अन्य मागण्यांसाठी ओबीसी समाजातर्फे येत्या शुक्रवारी (दि. १८) जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, रहावे असे आवाहन ओबीसी समाजाचे नेते ज्ञानदेव पवार, तालुका अध्यक्ष अरुण चाळके यांनी रविवारी (दि. १३) माणगाव येथे पत्रकार परिषदेत दिले.

ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबीत मागण्यांसाठी ओबीसी जनमोर्चाचे राज्य अध्यक्ष प्रकाशअण्णा शेडगे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी सकाळी १० वाजता अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यासंबंधी माहिती देण्यासाठी माणगाव येथील कुणबी समाज हॉलमध्ये रविवारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत ज्ञानदेव पवार व अरुण चाळके बोलत होते. अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून या मोर्चाची सुरूवात होणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ मोर्चाची सांगता होणार असल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली.

१९३१ नंतर गेल्या ९१ वर्षात जातीनिहाय जनगणना झालेली नाही. त्यामुळे समाजातील शोषित, वंचितांची नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही. भावी पिढीच्या उत्कर्षासाठी जातीनिहाय जनगणना होणे अत्यावश्यक आहे. असे मत या वेळी पवार यांनी व्यक्त केले.

ओबीसींची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय स्थिती कशी आहे? हे कळल्याशिवाय त्यांच्या विकासासाठी धोरण ठरविता येणार नाही, असे चाळके यांनी सांगितले. महादेवराव बक्कम, सुभाष भोनकर, रामभाऊ टेंबे, राजेंद्र खाडे, अशोक पाटील, दिलीप अंबावले, शांताराम मेकडे, सुमीत सूर्यकांत काळे या वेळी उपस्थित होते.

## खोपोलीत सुशोभीकरणासाठी लावलेल्या झाडांच्या कुंड्यांची दयनीय अवस्था; प्रशासनाचे दुर्लक्ष

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाच्या संरक्षक भिंती लगत, त्याचप्रमाणे आरडी नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुशोभीकरणासाठी ठेवण्यात



आलेल्या झाडांच्या कुंड्यांची दयनिय अवस्था झाली आहे, काही कुंड्या तुटलेल्या अवस्थेत आहेत तर, काही कुंड्यांमधील लावण्यात आलेली झाडे पाणी न मिळाल्यामुळे सुकून जात आहेत.

पूर्वी या ठिकाणी परिसरातील रहिवासी कचरा टाकत असत. भरकटणारे प्राणी कचरा इतरत्र पसरवत असत. त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्यांना याचा त्रास होत असे. दरम्यान, आरडी नगर रहिवाशांच्या मागणीनंतर खोपोली नगर परिषद तर्फे त्या ठिकाणी झाडांच्या कुंड्या ठेवण्यात आल्या. सुशोभीकरणासाठी ठेवण्यात आलेल्या कुंड्यांच्या देखभालीची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न येथील रहिवाशांना पडला आहे. नगरपालिकेची जबाबदारी असेल तर, उद्यान खात्याचे अधिकारी याकडे लक्ष देतील का? असा सवाल नागरिक करीत आहे.

## द्रुतगती मार्गावर ट्रक व बसचा अपघात; तिघे गंभीर, आठ प्रवासी किरकोळ जखमी





**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रविवारी (दि. १३) रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास पुणे लेनवरील किमी ४०.६०० येथे ट्रक व बसमध्ये अपघात घडला. या अपघातात तीनजण गंभीर व आठ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

चालक नावेद खान (रा. नागपूर) हा त्याच्या ताब्यातील ट्रक (एमएच-४०,बीजी-३४५७) घेऊन पुण्याकडून मुंबईकडे जात होता. द्रुतगती मार्गावरील किमी ४०.६०० येथे ट्रकचा ब्रेक निकामी झाला. त्यामुळे ट्रक मुंबई लेनवरून पुणे लेनवर जाऊन बस (केए-४१,डी-१४७१) च्या उजव्या बाजूकडील भागावर जाऊन उलटला. या अपघातामध्ये ट्रक चालक नावेद खान व बसमधील दोन प्रवाशांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अन्या आठ प्रवासी किरकोळ जखमी झाले. तात्काळ मदतकार्य उपलब्ध झाल्याने मोठी जीवितहानी टळली.

# शिवकालीन शस्त्रकला प्रशिक्षणवर्गास माणगावच्या शिवप्रेमींचा उत्तम प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वराज्य स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने माणगाव येथे शिवकालीन शस्त्रकला प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याला युवक, युवतींबरोबरच, बालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.



शिवकालात शस्त्रांबरोबरच अंगीभूत कौशल्यालाही महत्त्वाचे स्थान होते. तलवारबाजी, दांडपट्टा चालविणे, ढाल, कट्यार, कुकरी, वाघनखे, धनुष्यबाण, भाले इत्यादी शस्त्रांना महत्त्व होते. आधुनिक काळात शस्त्र व शस्त्र चालविणाच्या कौशल्यांच्या बाबतीत बदल झाला असला तरी शिवकालातील शस्त्रकलेचे शिवप्रेमींनी आकर्षण आहे. ही बाब लक्षात घेऊन स्वराज्य स्पोर्ट्स असोसिएशनने प्रशिक्षक शिरीष नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव येथे शिवकालीन शस्त्रकला प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे. ग्रामीण व शहरी भागातील शस्त्रकला प्रेमी नागरिकांचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

समीर महामुनकर, सखाराम कदम, सुशील महामुनकर इत्यादींनी आयोजित केलेल्या या वर्गात तलवारबाजी, मल्लखांब, लाठीकाठी इत्यादीचे प्रशिक्षण दिले जात आहे.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची सहविचार सभा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद या संघटनेची सहविचार सभा रविवारी (दि. १३) माणगाव येथील साबळे विद्यालयात झाली.




सहविचार सभेचे प्रास्ताविक दिलीप उभारे यांनी केले राज्य शिक्षक परिषदेचे अध्यक्ष वेणूनाथ कडू आणि जिल्हाध्यक्ष लक्ष्मण वालुगडे या सहविचार सभेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. व सर्व शिक्षक बांधवांशी संवाद साधला. या वेळी शिक्षकांच्या विविध प्रश्नसंबंधी तसेच समस्यांवर चर्चा करण्यात आली.

संघटनेचे कार्यकारी सदस्य शिवाजी सागडे, तालुका सहकार्यवाह विजय भामरे यांच्यासह रायगड जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते या सहविचार सभेला उपस्थित होते. साबळे विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एम. जाधव यांनी आभार मानले.

# साजगाव यात्रेत सुटीचा फिवर | नागरिकांची गर्दी, सुकी मासळी बाजार बनले उलाढालीचे केंद्र





**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील साजगांव-ताकई येथील विठ्ठल मंदिर परिसरात कार्तिकी एकादशीपासून प्रसिद्ध बोंबल्या विठोबाची यात्रा सुरू आहे. शनिवार व रविवारी या यात्रेत यात्रेकरूंची मोठी गर्दी झाली होती. या दोन दिवसांत विशेषतः रविवारी येथील व्यवसाय व आर्थिक उलाढालीला झळाळी प्राप्त झाली. त्यातही मिठाई व मासळी बाजारात मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन तेथे सर्वाधिक आर्थिक उलाढाल झाली.

धाकटी पंढरी अशी ओळख असलेल्या साजगाव यात्रेचा दुसरा आठवडा सुरू आहे. पहिला आठवडा काहीसा निरुत्साही वातावरणात गेला. मात्र दुसऱ्या आठवड्यातील शनिवार व रविवारी यात्रेत मोठ्या प्रमाणावर यात्रेकरूंची गर्दी झाली होती. रविवारी तर सकाळपासूनच यात्रेत गर्दी होण्यास सुरुवात झाली होती. दुपारनंतर यात्रेत पाय ठेवता येणार नाही, एवढी गर्दी झाली. त्यामुळे मागील काही दिवसांतील येथील निरुत्साही वातवरण संपुष्टात आले. या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात मालाची विक्री होऊन आर्थिक उलाढाल झाली. यातही मिठाई व सुक्या मासळीचा बाजार सर्वांचे आकर्षण ठरले. सुट्टीच्या निमित्ताने यात्रेत सहकुटुंब आलेली बच्चे कंपनी व तरुणांची प्रचंड गर्दी होती. या दोन दिवसांत यात्रेत विविध प्रकारची सुकी मासळीची खरेदी यात्रेकरूंनी केली व खास आकर्षण असलेल्या गरमागरम जिलेबीचा अस्वाद खवय्यांनी मनमुरादपणे घेतला.

उत्तम व योग्य दरात चांगली सुकी मासळी येथे मिळत असल्याने साजगावची यात्रा सुकी मासळी खवय्यांसाठी मोठी पर्वणी ठरते. खोपोली शहर तसेच पेण, खालापूर, कर्जत तालुक्यातील व घाट माथ्यावरील हजारो कुटूंबे व नागरिक या यात्रेत खास सुकी मासळी खरेदी करण्यासाठी येतात. आलेल्या यात्रेकरुंनी या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात सुकी मासळी खरेदी केली, अशी माहिती मासळी व्यापारी कांचन कोळी व अन्य व्यापाऱ्यांनी दिली.

यात्रेत गर्दीच्या काळात कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी खोपोली पोलीस, यात्रा कमिटी, खोपोली नगरपालिका प्रशासनाकडून सर्व खबरदारी घेण्यात आली आहे.

# अलिबागमध्ये मधुमेह तपासणी शिबिर

## श्रीबाग लायन्स क्लबचा उपक्रम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जागतिक मधुमेह दिनानिमित्त अलिबागमधील श्रीबाग लायन्स क्लबने रविवारी (दि. १३) मोफत मधुमेह तपासणी शिबिर आयोजित केले होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, लायन्स क्लबचे झोनल चेअरमन ॲड अंकित बंगेरा, नुगाबेस्ट सेंटरचे संचालक सूरज यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

अलिबाग जिल्हा रुग्णालयातील डॉ. शीतल जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबिरार्थींची तपासणी केली. श्रीबाग लायन्स क्लबच्या अध्यक्षा ॲड. कला पाटील, उपाध्यक्ष संजय रावले, सेक्रेटरी संदीप वारगे, खजिनदार अमित देशमुख आदी या वेळी उपस्थित होते. डॉ. ॲड. निहा राऊत यांनी अलिबागच्या नुगाबेस्ट सेंटरला वॉटर डिस्पेन्सर पंप भेट दिला.

क्लबच्या संस्थापक अध्यक्षा ॲड. निहा राऊत, सदस्य सौमिनी म्हात्रे, विजय वनगे, रमेश मढवी, नितीन पाटील, ॲड. भुपेंद्र पाटील, पल्लवी पाटील, रश्मी वारगे तसेच नुगाबेस्ट सेंटरचे संचालक सूरज यादव व कर्मचाऱ्यांनी हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.



# उंच उडीत आर्यन पाटीलला ‘सुवर्ण’




**माणगाव : प्रतिनिधी**

आसाममधील गुवाहाटी येथे झालेल्या ३७व्या नॅशनल ज्युनिअर अ‍ॅथलेटिक चॅम्पियनशीपमध्ये उंच उडी खेळात रायगड जिल्ह्यातील आर्यन अरुण पाटीलने सुवर्णपदक पटकाविले. यापूर्वी खेलो इंडिया स्पर्धेत आर्यनने रौप्यपदक जिंकले होते. आर्यनला केंद्र शासनातर्फे पाच लाख आणि राज्य शासनाकडून दोन लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

आर्यन पाटीलचे वडील अरुण पाटील हे माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून आईदेखील शिक्षिका आहे. आर्यनचे मूळगाव रावे (ता. पेण) आहे. तो शालेय वयापासून उंच उडी खेळात त्याच्या एस. एस. निकम शाळेचे प्रतिनिधित्व करीत होता. तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर त्याने चांगली कामगिरी केली आहे.

ओडिशामधील स्पर्धेत आर्यन पाटीलने सुवर्णपदक जिंकून फ्रान्स या देशात आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. आर्यन पाटील सध्या रसायनीतील पिल्लई कॉलेजमध्ये एफवाय. बी.एससीत शिकत आहे. मुंबईतील साई अकॅडमीच्या माध्यमातून तो खेळत असून त्याला प्रशिक्षक इंझमाम-उल-हल यांचे प्रशिक्षण लाभत आहे.

आर्यनने राज्य तसेच राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेत सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके प्राप्त केली आहेत. नॅशनल ज्युनिअर अ‍ॅथलेटिक चॅम्पियनशीपमध्ये सुवर्ण पदक प्राप्त केल्याबद्दल वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगाव समितीचे अध्यक्ष महादेव जाधव, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पिल्लई कॉलेजच्या प्राचार्य, संचालक, प्राध्यापक तसेच क्रीडा क्षेत्रातून त्याचे अभिनंदन होत आहे.

# रायगड जिल्हा असोसिएशनतर्फे कबड्डी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे प्रौढ गट पुरुष, महिला, कुमार गट मुले-मुली, किशोर गट मुले-मुली कबड्डी स्पर्धांना या हंगामात खर्‍या अर्थाने सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर विविध गटांची स्पर्धा वेगवेगळ्या ठिकाणी होणार आहे.

उरण तालुक्यातील बोकडवीरा येथे भालचंद्र स्पोर्ट्सच्या संयोजनाखाली १९ व २२ नोव्हेंबर रोजी कुमार गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे निखिल मयेकर मित्र मंडळाच्या संयोजनाखाली २६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत पुरुष व महिला गटाच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पेण तालुक्यातील कणे येथे साहिल इंटरप्राईजेस व ग्रामस्थ मंडळाच्या संयोजनाखाली ४ व ५ डिसेंबर रोजी किशोर व किशोरी गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेतून निवडले जाणारे पुरुष, महिला, कुमार गट, किशोर गट संघ महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात येणार्‍या राज्य स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

# गव्हाण विद्यालयाचा मुलांचाही खो-खो संघ उपविजेता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे झालेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत खो-खो प्रकारात रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील मुलांचा संघही उपविजेता ठरला आहे.

१४ वर्षे वयोगटातील अटीतटीच्या अंतिम लढतीमध्ये शिरढोण येथील वासुदेव बळवंत फडके विद्यालयाच्या मुलांच्या संघाने सामना जिंकून विजेतेपद पटकाविले. गव्हाण संघ केवळ एक गुणाने पराभूत झाला. या संघाकडून कर्णधार सर्वेश कोळी, नैतिक म्हात्रे, कृतीक म्हात्रे व राहुल उलवेकर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळी करून एकूण चार सामने खेळले आणि अंतिम सामन्यात उपविजेते होण्याचा मान मिळविला.

गव्हाण संघातील खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका साधना डोईफोडे, उपमुख्याध्यापक व प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांचे मार्गदर्शन लाभले. या संघाचे अभिनंदन होत आहे.

# वर्ल्ड टूर फायनल्समधून सिंधूची माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूने डाव्या घोट्याच्या दुखापतीतून अद्याप पूर्णपणे बरी न झाल्याने बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर फायनल्स या मोसमातील अंतिम बॅडमिंटन स्पर्धेतून माघार घेतली आहे. या स्पर्धेत २०१८ची चॅम्पियन सिंधू ऑगस्टमध्ये राष्ट्रकुल खेळादरम्यान जखमी झाली होती. बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर फायनल्स १४ डिसेंबरपासून चीनच्या ग्वांगझू येथे खेळवली जाणार आहे.

सिंधूचे वडील पी. व्ही. रामण्णा यांनी ‘पीटीआय’ला सांगितले की, डॉक्टरांनी सिंधूला आणखी काही दिवस विश्रांती घेण्यास सांगितले आहे, जेणेकरून ती नवीन हंगामापूर्वी पूर्णपणे तंदुरुस्त होईल. त्यांनी सर्व पैलूंचा विचार केला. ग्वांगझूमध्ये अनेक निर्बंध असून नवीन हंगाम लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे.

रामण्णा पुढे म्हणाले, सिंधूने दोन आठवड्यांपूर्वी प्रशिक्षण सुरू केले असून जानेवारीपर्यंत ती पूर्णपणे तंदुरुस्त होईल. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन तिने भारतीय बॅडमिंटन असोसिएशनला पत्र पाठवून आपल्या निर्णयाची माहिती दिली. सिंधूच्या माघारीमुळे या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत केवळ एचएस प्रणॉय भारताचे प्रतिनिधित्व करेल.

# मोटरसायकल शर्यतीत रिसचा वेदांत द्वितीय

## पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या हस्ते सत्कार



(छाया : राकेश खराडे)

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लोणावळा येथे झालेल्या ऑल इंडिया दि व्हिली रन २०२२ क्लास एफ-३ या वेगवान व्हिली भारतीय मोटरसायकल स्पर्धेत खालापूर तालुक्यातील रिस येथील तरुण व प्रिआ स्कूलचा विद्यार्थी वेदांत सुधीर शिंदे याने दुसरा क्रमांक पटकाविला आहे. वेदांत हा पोलीस उपनिरीक्षक सुधीर शिंदे याचा चिरंजीव असून या यशाबद्दल त्याचा गणेशनगर येथील कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

वेदांत हा ५५० सीसी मोटरसायकल चालवितो. विशेष म्हणजे महामार्गावर कित्येक किलोमीटर अंतर एका चाकावर मोटरसायकल चालविणारा वेदांत जिल्ह्यातील एकमेव वेगवान चालक असावा. त्याच्या सत्कार समारंभाला रसायनी पोलीस ठाण्याचे निरीक्षक अश्वनाथ खेडकर, उपनिरीक्षक सुधीर शिंदे माजी सरपंच संदीप मुंढे, कृष्णाशेठ पारंगे, युवा नेते अंकित साखरे, सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते. सर्वांनी वेदांतचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



# व्हॉलिबॉल अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत मांडवखार संघ विजेता

**खारेपाट : वार्ताहर**

रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलिबॉल प्रमोशन असोसिएशनतर्फे कोएसो हायस्कूल माणकुले येथील पटांगणात जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा झाली. या स्पर्धेत जय मल्हार स्पोर्ट्स मांडवखार संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत मुरूड, पेण, पाली, अलिबाग, खालापूर, पनवेल तालुक्यातील संघ सहभागी झाले होते. द्वितीय क्रमांक मॉडेल संघ रांजणखार, तृतीय बोर्ली मांडला संघ, तर चतुर्थ क्रमांक सुपर किंग पनवेल संघाने पटकाविला. या स्पर्धेमधून निवडलेला संघ ३ व ४ डिसेंबर रोजी पारनेर (जि. अहमदनगर) येथे होणार्‍या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

# केरळमध्ये फुटबॉल फिव्हर

## गावागावात उभारले स्टार फुटबॉलपटूंचे कटआउट

**तिरूवनंतपूरम : वृत्तसंस्था**



कतारमध्ये २० नोव्हेंबरपासून फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होत असून यासाठी जगातील सर्व देशांसह भारतातील फुटबॉलप्रेमींनी तयारी सुरू केली आहे. फुटबॉलप्रेमासाठी प्रसिद्ध असलेल्या केरळमधील चाहत्यांनीही या वेळी क्रिस्टियानो रोनाल्डो, नेमार आणि मेस्सीसारख्या खेळाडूंचे कटआऊट लावून आपल्या आवडत्या संघांना पाठिंबा दर्शविण्यास सुरुवात केली आहे.

केरळमधील एका गावात अर्जेंटिनाच्या एका चाहत्याने मेस्सीचा ३० फूट उंच कटआउट कुरुंगट्टू कदावु नदीच्या मध्यभागी लावला. दुसर्‍या एका चाहत्याने ब्राझीलचा खेळाडू नेमारचा ४० फूट उंच कटआउट लावून ब्राझील संघाला पाठिंबा दर्शवला, तर पोर्तुगीज संघाच्या चाहत्यांना रोनाल्डोचा ४५ फूट उंच कटआउट लावून आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या तिन्ही कटआउट्सचा एकत्र काढलेला एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे आणि जगभरातील फुटबॉल चाहत्यांना भारताच्या या खेळावरील प्रेमाची चाहूल लागली आहे.

केवळ नदीवरच नाही तर, केरळच्या मोठ्या शहरांपासून लहान शहरांपर्यंत प्रत्येक कानाकोपर्‍यात चाहते खेळाडूंचे कटआऊट, देशांचे झेंडे लावून फुटबॉल विश्वचषकाची उत्कटता दाखवत आहेत. ही काही पहिलीच वेळ नाही, तर दर चार वर्षांनी केरळमध्ये विश्वचषकादरम्यान असे चित्र पाहायला मिळते. केरळमध्ये केवळ ब्राझील, अर्जेंटिनाच नाही तर इतर देशांतील चाहतेही मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

यंदा विश्वचषक कतारमध्ये आयोजित केला जात आहे, ज्यात आधीच केरळचे लोक आहेत आणि त्यामुळे या राज्यातील चाहत्यांना यंदाचा विश्वचषक आणखी जवळचा वाटत आहे. २० नोव्हेंबर रोजी विश्वचषकातील पहिला सामना यजमान कतार आणि इक्वेडोर यांच्यात होणार आहे.

# पनवेल महापालिकेच्या शालेय क्रीडा स्पर्धेला सुरुवात

**पनवेल : प्रतिनिधी**

येथील महापालिकेच्या सन २०२२-२३च्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेला सोमवारी (दि. १४) उत्साहात सुरुवात झाली. कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीत आयुक्त गणेश देशमुख आणि अतिरिक्त आयुक्त संजय घरत यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा होत आहे.



यामधील क्रिकेट स्पर्धेचे उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी पहिला सामना सेंट जोसेफ हायस्कूल आणि एमएनआर हायस्कूल यांच्यात खेळला गेला.

या स्पर्धेत महापालिका हद्दीतील १४, १७, १९ वर्ष मुले व मुलींनी सहभाग नोंदविला आहे. या वेळी केएएसच्या सीइओ क्षमा फाटक, महापालिकेचे क्रीडा विभाग प्रमुख नामदेव पिचड, क्रीडा शिक्षक समीर रेवाळे, पंच, विद्यार्थी उपस्थित होते.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या सुमारे ४९ विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात येणार असून या अंतर्गत आतापर्यंत व्हॉलीबॉल, लॉन टेनिस, फुटबॉल, हॉकी अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या आहेत.

# पोलादपूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील लोहारे देऊळकोंड येथील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात ७ ते १८ नोव्हेंबरदरम्यान तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. आहे. या स्पर्धेचे उद्घाटन चंद्रकांत कळंबे यांच्या हस्ते बालदिनी झाले.

उद्घाटन समारंभास नायब तहसीलदार समीर देसाई, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, माजी जि. प. सदस्य सुमन कुंभार, माजी पं. स. सदस्य यशवंत कासार, सहयोग प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक चित्रे, विभावरी चित्रे, कार्याध्यक्ष रमेश चव्हाण, मुख्याध्यापिका सुगंधा वाढवळ, क्रीडा शिक्षिका शुभांगी उतेकर, रंजना जाधव, दीपक सकपाळ आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना चंद्रकांत कळंबे म्हणाले की, आमदार भरत गोगावले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केलेल्या मागणीनुसार नजिकच्या काळात रानबाजिरेतील एमआयडीसी धरणालगतचे भूसंपादित क्षेत्र तीन कोटी खर्चाच्या क्रीडासंकुलासाठी निश्चित करण्यात येणार आहे.

# विश्वास मोटे यांनी गोवा ट्रायलॉथॉन केली यशस्वी



**मुंबई : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महापालिकेचे सहाय्यक आयुक्त विश्वास मोटे यांनी गोव्यात रविवारी (दि. १३) झालेल्या हाफ ट्रायलोथॉन स्पर्धेत गोवा आयन मॅन ७०.३ हा पुरस्कार मिळवला. यात १.९ किमी पोहणे, ९० किमी सायकलिंग आणि २१ किमी धावणे याचा समावेश होता. हे सर्व एकत्रितपणे त्यांनी सात तास २९ मिनिटांत पूर्ण केले.

मोटे हे महापालिकेतील उत्साही आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून परिचित आहेत. रोजचा व्यायाम, सायकलिंग, पोहणे व धावणे हे प्रत्येकाने केल्यास आपले आरोग्य उत्तम राखता येईल असे ते सर्व सहकार्‍यांना सांगत असतात.

डिटरमिनेशन, डेडिकेशन, डिसीप्लिन ही त्रिसूत्री ते देतात. २०१७ साली टाटा ड्रीम रनमध्ये सहभाग, २०१८मध्ये टाटा हाफ मॅरेथॉन, २०१९ टाटा फुल मॅरेथॉन (आपला ४२वा वाढदिवस हा ४२ किमी धावण्यात सहभाग घेऊन त्यांनी साजरा केला), २०२० टाटा फुल मॅरेथॉन त्यांनी पूर्ण केली. आता गोवा ट्रायलोथॉन पार करून त्यांनी नवा विक्रम केला असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com